रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १०४ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

गजानन तू गणनायक,
विघ्नहर्ता तू विघ्नविनाशक...
तूच भरहासी त्रिभुवनी ठायी ठायी
जन्मची ऐसी हजारी,
ठेविण्या मस्तक तूच पायी
मोरया, रे बाप्पा मोरया..!

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ११ सप्टेंबर २०२४
किंमत ४ ₹

हातमाग व यंत्रमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री
गौरी गणपती सणानिमित्त स्पेशल ऑफर
20% * संयोजक:-भाऊराया हॅन्डलुम,सोलापूर.*
स्थळ 1 महात्मा गांधी वाचनालय पेण
स्थळ 2 सार्वजनिक वाचनालय डोंगरे हॉल पोस्ट ऑफिस समोर अलिबाग
१ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर पर्यंत वेळ-सकाळी 10 ते रात्री ९ पर्यंत

रजि. नं. : आर.जी.डी./ए.बी.जी./आर.एस.आर./सी.आर./३०८/९२
कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग
(ISO 9001 - 2015 मानांकन प्राप्त)
अध्यक्ष, संचालक मंडळ व कर्मचारी वृंद यांचेतर्फे
जिल्ह्यातील १६ शाखांतील सर्व भागधारक /ठेवीदार/ ग्राहक/ कर्जदार हिंतचिंतकांच्या योगदानाबद्दल
हार्दिक आभार
प्रत्येक कुटुंबाची, कुटुंबातील प्रत्येकाची - कमळ पतसंस्था
₹ 706 कोटी
एकत्रित व्यवसायाचा टप्पा पूर्ण!
ठेवी ₹३०९ कोटी १५ लाख
कर्ज ₹३९७ कोटी १० लाख
गुंतवणूक ₹११३ कोटी २८ लाख
एकत्रित व्यवसाय ₹७०६ कोटी २५ लाख
जिल्ह्यात No 1
गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया!

आजचा अग्रलेख
'अंतराळगौरी'ची कहाणी

वे|ध|क

## अनधिकृत ऑईल कारखान्याला आग

**खोपोली :** विजय प्रीत कंपनीत वाहनांच्या टायरचे विघटन करून ऑईल उत्पादन करणाऱ्या कारखान्यात प्रेशर बॉयलर लिकेज झाल्याने टायरच्या साठ्याला भीषण आग लागल्याची घटना मंगळवार दि.११ सप्टेंबर रोजी घडली. आगीत कंपनीतील सर्व कच्चा माल जळून खाक झाला आहे. धुराचे लोट कुंभिवली गावात पसरल्यामुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली होती. या कंपनीत सहा महिन्यांत दुसऱ्यांदा आग लागल्याची घटना घडली असून, कंपनी मालकाकडे ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी पान २ वर

## पोलीस भरतीची निवड यादी प्रसिद्ध

**रायगड :** जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई, चालक आणि बँड्समनची एकूण ४२२ रिक्त पदांसाठी तब्बल ३१ हजार ६३ अर्ज प्राप्त झाले होते. याबाबतची मैदानी चाचणी १२ जून ते २० जुलै २०२४, कौशल्य चाचणी ११ ते १४ ऑगस्ट २०२४ आणि पोलीस शिपाई लेखी परीक्षा १० ऑगस्ट २०१४ रोजी, तर चालक पोलीस शिपाई आणि बॅन्ड्समन यांची लेखी परीक्षा २० ऑगस्ट २०२४ रोजी पार पडली होती. पास झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये पोलीस शिपाई पुरुष पान २ वर

# विद्यार्थ्यांना 'कंत्राटी' शिक्षण


■ १ हजार २३८ शाळांवर होणार शिक्षकांची भरती
■ शासनाचा निर्णय अन्यायकारक असल्याचा शिक्षक संघटनेचा आरोप

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून शासनाने सर्वच क्षेत्राचे कंत्राटीकरण करण्याचा सपाटा लावला आहे. वीज, रेल्वे, विमान, बँका, विमा, सैन्य इत्यादींसह अनेक सरकारी आणि सहकारी संस्था खासगी कंपन्यांना चालविण्यासाठी दिल्या जात आहेत. आता शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद राहिले नसून, शिक्षकांची पदभरती कंत्राटी पद्धतीने करण्याचा शासन निर्णय नुकताच निर्गमित केला आहे. वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांवर कंत्राटी शिक्षक नेमण्यावर सरकारने भर दिला आहे. शालेय शिक्षण विभागाने याबाबतचे परिपत्रक जारी केले आहे. रायगड जिल्ह्यातील १ हजार २३८ शाळांवर कंत्राटी शिक्षक भरले जाणार आहे. सरकारच्या या निर्णयाचा प्राथमिक शिक्षक संघाकडून तीव्र विरोध दर्शविला जात आहे. तुटपुंज्या मानधनावर कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती करून बेरोजगारांची थट्टा उडविण्याचा प्रयत्न सरकार करीत असल्याची संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहे.

निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सध्या विविध योजनांची सरकारकडून खैरात केली जात आहे. अशातच प्रशासकीय खर्चात कपात करून मतदारांना आमिष दाखविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध केला जात आहे. यासाठी शिक्षणाचे कंत्राटीकरण करण्याचा सरकारने घातलेला घाट लाजिरवाणा असल्याचे मत बी.एड् शिक्षण घेतलेल्या तरुणाने व्यक्त केले आहे. शिक्षण हा कोणत्याही समाजाच्या आणि पर्यायाने राष्ट्राच्या विकासाचा पाया असतो. विकसित राष्ट्रांनी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बळावर विकासाचे स्वप्न सत्यात उतरविले. विकसित राष्ट्रांचे उद्दिष्ट साध्य करण्याचे स्वप्न पाहणारा आपला देश मात्र विकासाचा मुख्य पाया असलेल्या शिक्षणाचे पान २ वर

> जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या ३ हजार ५८३ शाळा आहेत. या शाळांमध्ये १९ हजार ५१५ शिक्षक कार्यरत असून, पाच लाख १९ हजार ७८७ विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम हे शिक्षक करीत आहेत. जिल्हा परिषदेच्या दोन हजार ५२८ शाळा आहेत. यामध्ये ५ हजार ५४६ शिक्षक असून, ९१ हजार ३४३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



> “सरकारने मागील काही महिन्यापुर्वी सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती शाळेत केली होती. मात्र, गरज सरो आणि वैद्य मरो या पद्धतीने त्यांच्याकडील काम पूर्ण झाल्यावर त्यांना घरी बसविण्यात आले आहे. आता सरकारने बी.एड्, डी. एड्धारकांना कंत्राटी शिक्षक घेण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, हा निर्णय अन्यायकारक आहे. शिक्षक संघाकडून त्याला विरोध दर्शविला जात आहे.”
> – प्रमोद भोपी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, तालुका शाखा अलिबाग

> “शासन निर्णयानुसार वीस कमी पटसंख्या असलेल्या शाळेतील शिक्षकांची माहिती घेतली जाणार आहे. ज्या शाळेत शिक्षक कमी आहेत, त्या शाळेत शिक्षक नियुक्त करण्यासाठी जाहिरात दिली जाणार आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.”
> – पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग, रायगड जिल्हा परिषद

# राज्यात विधानसभेत आघाडीलाच बहुमत

■ 'लोकपोल'चा सर्वेक्षणातून दावा
■ मविआला १४१ ते १५४ जागा, तर महायुतीला ११५ मिळणार जागा

। मुंबई । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीने भाजप आणि एनडीएला जोरदार टक्कर दिली. त्याचा राज्यात भाजपाला मोठा फटका बसला. दरम्यान, राज्यातील विधानसभा निवडणुकीतही लोकसभा निकालाचीच पुनरावृत्ती होण्याची शक्यता लोकपोल संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून समोर आली आहे. विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वीच लोकपोलचा ओपिनियन पोल समोर आला असून, महायुती ११५, तर महाविकास आघाडीला १४१ ते १५४ जागा मिळतील, असा दावा करण्यात आला आहे. आघाडीला बहुमत मिळणार असून, काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळतील, असेही पोलमध्ये सांगण्यात आले आहे.

राजकीय मुद्द्यांवर सर्वेक्षण, अंदाज, मतचाचणी अशा विविध गोष्टींवर काम करणाऱ्या लोकपोलनं केलेल्या सर्व्हेचे निष्कर्ष पान २ वर

### काय आहे लोकपोलचा निष्कर्ष?

लोकपोलनं त्यांच्या एक्स अकाऊंटवर शेअर केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला १४१ ते १५४ जागा मिळतील. तर दुसरीकडे सत्ताधारी महायुतीला ११५ ते १२८ जागा मिळू शकतील. अपक्ष व इतर छोट्या पक्षांच्या मिळून ५ ते १८ जागा महाराष्ट्रात जिंकून येऊ शकतात. या आकडेवारीनुसार राज्यात महाविकास आघाडीला सत्तास्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ जुळवण्यात यश मिळू शकेल, असं दिसून येत आहे.

# कर्जत तिहेरी हत्याकांडाचे गूढ उकलले

■ सख्खा भावानेच केली हत्या, सलग ३६ तास पोलिसांनी केली चौकशी
■ पांढऱ्या शर्टवरुन आरोपीला केले गजाआड

। रायगड । खास प्रतिनिधी ।

कर्जत येथील तिहेरी हत्याकांडाचे गूढ उकलण्यात रायगड पोलिसांना यश आले आहे. सख्खा भाऊ, त्याची पत्नी आणि मुलाला ठार मारणारा हनुमंत पाटील याला पोलिसांनी तपासादरम्यान अटक केली होती. त्यानेच हत्या केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. न्यायालयाने आरोपीला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

आरोपीची सलग ३६ तास चौकशी करण्यात आली. त्यामध्ये आरोपीने हत्या करताना वापरलेला



शर्ट आणि नंतर त्याने परिधान केलेला टी-शर्ट याच्यामध्ये विसंगती आढळल्याने पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्रकार पान २ वर

### 'त्या' पांढऱ्या शर्टवरुन आरोपीच्या मुसक्या आवळल्या

मामाकडे राहायला आलेल्या हनुमंतने चिकनपाडा येथे जाऊन तिघांची हत्या केली आणि पहाटे पुन्हा मामाकडे पोशीर गावात आला. तेथे पहाटेच गणपतीसमोर खुर्चीत बसला. जेणे करून सर्वांना वाटावे की तो अन्य कोठे गेला नाही. मात्र, पोशीर येथील एका शाळेमधील सीसीटीव्हीत तो कैद झाला होता. हत्या करण्यासाठी जाताना त्याने पांढरा शर्ट परिधान केला होता. हत्या करून परतताना त्याने अंगात टी-शर्ट परिधान केला असल्याचे समोर आले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली.


# महानगरांना डेंग्यूचा विळखा!

■ आरोग्य विभागाची होतेय धावाधाव
■ दरदिवशी सापडताहेत २० हून अधिक रुग्ण

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

महानगराची ओळख निर्माण करू पाहणाऱ्या पनवेलला डेंग्यूचा विळखा पडत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. या महानगरातून आता अलिबाग, पेणमधील या ग्रामीण भागात डेंग्यूचे रुग्ण अधिक सापडत आहेत. मागील अनेक दिवसांपासून डेंग्यूने थैमान घातले आहे. डेंग्युला रोखण्यासाठी आरोग्य विभाग कामाला लागले आहे. मात्र, हे संकट संपेना अशी परिस्थिती निर्माण झाल्याने पान २ वर

> “जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या दहा दिवसांपासून नऊ रुग्ण उपचार घेत आहेत. रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु असून, त्यांना लागणाऱ्या पेशींचा साठा उपलब्ध आहे.”
> – डॉ. शीतल जोशी, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड



# जयदीप आपटेच्या पोलीस कोठडीत वाढ

**सावंतवाडी :** मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे व बांधकाम रचना सल्लागार डॉ. चेतन पाटील यांची पाच दिवसांची पोलीस कोठडी संपल्याने मंगळवारी (दि. १०) दुपारी पुन्हा मालवण न्यायालयात हजर करण्यात आले. यामध्ये जयदीप आपटे याला दि. १३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी, तर पाटील याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पाटील याची सावंतवाडी कारागृहात रवानगी करण्यात येणार आहे.

राजकोट किल्ला पान २ वर

## सोनपावलांनी गौराई आली माहेराला...



● बाप्पाच्या आगमनानंतर सर्वांना वेध लागतात ते माहेरवाशीण असलेल्या गौराईच्या आगमनाचे. मंगळवारी मोठ्या उत्साहात सोनपावलांनी गौराई माहेरपणाला आली. तिची घरोघरी मोठ्या भक्तीभावाने पूजा करण्यात आली. (छायाचित्र : समीर मालोदे)

# अन्न व औषध प्रशासन ॲक्शन मोडमध्ये

### मिठाई उत्पादक, विक्रेत्यांनी दक्षता घेण्याचे आवाहन

। रायगड । खास प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील मिठाई उत्पादक, विक्रेते व हॉटेल व्यावसायिकांनी सणासुदीच्या काळात मिठाईसह अन्य अन्नपदार्थांच्या सेवनामुळे विषबाधासारखी अप्रिय घटना घडणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी, तसेच सर्व सूचनांचे पालन करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाने केले आहे.

मिठाई उत्पादक, विक्रेते व हॉटेल व्यावसायिकांनी आपल्या आस्थापनेचा परिसर हा पर्यावरणीय दृष्टीने व कीटकापासून संरक्षित व स्वच्छ ठेवावा. कच्चे अन्नपदार्थ परवानाधारक, नोंदणीधारक अन्न व्यावसायिकांकडून खरेदी करावेत, अन्नपदार्थ तयार करण्यासाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर करावा, पाणी पिण्यायोग्य पान २ वर

अस्सल कोकणी स्वाद
KHATU MASALE UDYOG
KHATU MASALE UDYOG SINCE 1975
कोकणी वडा पीठ
₹100/- Only
500g
खातू मसाले उद्योग
Available at www.khatumasaleudyog.com amazon JioMart Flipkart
Call: 9049662080,9920214230

## अकार्यक्षम अधिकाऱ्यांमुळे शहरात पाणीटंचाई...

# पाण्यासाठी कर्जतकरांचा टाहो!

■ ऐन सणासुदीत नागरिकांना धरलं जातंय वेठीस
■ नगरपरिषदेचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

। कर्जत । प्रतिनिधी ।

सध्या कर्जत नगरपरिषद हद्दीतील नागरिकांवर पाणीटंचाईचे संकट ओढावले आहे. ऐन सणासुदीचा तोंडावर कर्जत शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यात कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे आणि पाणी विभागाचे अभियंता अभिमन्यू येळवंडे हे असफल ठरले आहेत, असा आरोप कर्जतकरांचा आहे.

गेल्या काही महिन्यांपासून येथील नागरिकांना मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसल्याची तक्रारी वारंवार होत आहेत. परंतु, कर्जत नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना याचे कोणतेही



सोयरसुतक नाही. फक्त विजेचे कारण पुढे करत आपला नाकर्तेपणा झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जात आहे. गेली अनेक दिवस कर्जतमध्ये विजेची समस्याही तितकीच भयंकर झाली आहे. आणि तेच कारण पुढे करून कर्जत पान २ वर

> कर्जत शहरात ६ हजार ८०० नळजोडणी देण्यात आली आहेत. घराला १५०० रुपये, सोसायटीला ६००० तर व्यावसायिक ८००० रुपये पाणीपट्टी कर्जत नगरपरिषद आकारते. वर्षाला पाणीपट्टीपोटी दोन कोटींच्या घरात वसुली केली जाते.

कर्जत नगरपरिषदेने वंजारवाडी व दहिवली येथे करोडो रुपयांचे जनरेटर व तशी सिस्टीम बसवली आहे. तिचा उपयोग का होत नाही? हे न सुटलेले कोडं आहे. जलकुंभ भरण्यासाठी १५-१६ तास लागतात. आणि इतकी वेळ लाईट कधी जात नसते. बरं, ज्या दिवशी शटडाऊन असते, त्या दिवशी जनरेटरचा वापर का होत नाही. कर्जत नगरपरिषद यावर उत्तर देते की, परवडत नाही. हे उत्तर योग्य नाही. मग जनरेटरसाठी ही गुंतवणूक का केली?

पान १ वरून

## विद्यार्थ्यांना ‘कंत्राटी’ शिक्षण

संपूर्ण कंत्राटीकरण करण्याचा प्रयत्न करीत असल्याची भावना तरुणांनी व्यक्त केली आहे.

जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या ३ हजार ५८३ शाळा आहेत. या शाळांमध्ये १९ हजार ५१५ शिक्षक कार्यरत असून, पाच लाख १९ हजार ७८७ विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम हे शिक्षक करीत आहेत. जिल्हा परिषदेच्या दोन हजार ५२८ शाळा आहेत. यामध्ये ५ हजार ५४६ शिक्षक असून, ९१ हजार ३४३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांच्या वर्गखोल्यांची अवस्था दयनीय असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेली संरक्षक भिंत, सीसीटीव्ही कॅमेरे अशा अनेक सुविधांपासून शाळा वंचित आहेत. काही शाळांमधील पटसंख्या अधिक असले, तरी त्या ठिकाणी शिक्षक फक्त एकच अशी परिस्थिती अनेक शाळांची आहे. शिक्षकांनी शिक्षणाव्यतिरिक्त अन्य योजनांची कामेदेखील दिली जातात. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना विद्यार्थ्यांकडे लक्ष देण्यास अनेक वेळा वेळही मिळत नाही. त्याचा परिणाम जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊ लागली.

जिल्हा परिषद शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी सरकारने अनेक प्रयत्न केले. त्यामध्ये डिजिटल शाळा उभारणे, मुलांना खेळता खेळता शिक्षण देणे, दप्तराविना शाळा अशा अनेक प्रकारचे उपक्रम राबवून जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला. परंतु, हा सर्व प्रयत्न फोल ठरला. फेब्रुवारी २०२३ मध्ये सरकारने कंत्राटी शिक्षक नेमण्याचा निर्णय घेतला होता. आता यातील अनेक शिक्षकांना काढण्यात आले आहे. आता पुन्हा सरकारने सेवानिवृत्त शिक्षकांसह बी.एड्, डी.एड्धारकांना कंत्राटी शिक्षक म्हणून घेण्याचा निर्णय घेतला आहे. वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या १ हजार २३८ शाळांवर कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे. सरकारने कंत्राटी शिक्षकांची भरती करण्यावर भर दिल्याने त्याचा प्राथमिक शिक्षक संघटनेकडून तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. सरकारचा हा निर्णय अन्यायकारक असून, बी.एड्, डी. एड् झालेल्या बेरोजगारांना तात्पुरता दिलासा आहे. त्यांची कधीही नोकरीतून हकालपट्टी केली जाणार असल्याची भीती शिक्षक संघटनेने व्यक्त केली आहे.

## हत्याकांडाचे गूढ उकलले

परिषदेत दिली. मालमत्तेच्या वादातून हनमुंत पाटील याने अतिशय थंड डोक्याने तिघांची हत्या केल्याचे कबूल केले आहे. आरोपीचे कृत्य पूर्वनियोजित तसेच अत्यंत क्रूरपणे त्याने तिघांची हत्या केल्याने सदरचा खटला फास्ट ट्रॅकवर चालवण्यात येणार आहे. त्यामाध्यमातून आरोपीला फाशी मिळावी, अशी मागणी न्यायालयाकडे करणार असल्याचेही घार्गे यांनी स्पष्ट केले.

८ सप्टेंबर २०२४ रोजी कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये चिकनपाडा गावातील नदीमध्ये आठ वर्षांच्या मुलाचा मृतदेह आढळला होता. गावात मुलाचा मृतदेह नेला असता मुलाचे आई-वडील घरात नसल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी शोध घेतला असता त्याच नदीच्या पात्रामध्ये मुलाच्या आईचा तसेच काही अंतरावर वडिलांचा मृतदेह सापडला. मदन पाटील, माधुरी पाटील आणि त्याचा मुलगा याच्या मृतदेह शवविच्छेदनासाठी जे.जे. रुग्णालयात पाठवण्यात आले होते.

**पोलिसांनी केली सलग ३६ तास चौकशी**

पोलिसांनी संशयित म्हणून मृत मदन पाटील याच्या शेजारी राहणारा त्याचा सख्खा भाऊ हनुमंत पाटील याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान तो पोलिसांच्या प्रश्नांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. सलग ३६ तास विविध पोलीस अधिकारी त्याची चौकशी करत होते. मात्र, त्यांच्याकडून कोणतेच धागेदोरे सापडत नव्हते.

**पोलीस मदनला सोडून देणार होते**

प्रश्नांची सरबत्ती करुनदेखील हनुमंत डगमग नव्हता. आता त्याच्याकडून अधिक काही माहिती मिळणार नसल्याचे लक्षात येताच पोलीस अधिकारी त्याला सोडून देणार होते. त्यावेळी आरोपीने परिधान केलेला शर्ट आणि सीसीटीव्हीच्या फुटेजवरुन पोलिसांना एक धागा सापडला. आरोपी हा हत्याकांडाच्या दिवशी पोशीर गावात आपल्या चुलत मामाकडे गणपती दर्शनासाठी गेला. त्याआधी त्याने स्वतः च्या पत्नी आणि मुलांना पत्नीच्या माहेरी पाठवून दिले. त्या रात्री तो मामाकडेच जेवला आणि माळ्यावर झोपायला गेला.

**तिघांना अत्यंत क्रूरपणे संपवले**

भावाच्या घरात गणपती असल्याने दरवाजा उघडा होता. याचा फायदा घेऊन त्याने रात्री भावासह त्याची पत्नी आणि मुलाच्या डोक्यात वार करुन त्यांना ठार मारले. त्यानंतर घटनास्थळावरील पुरावे नष्ट केले. तिन्ही मृतदेहांना त्याने ठराविक अंतरावर नदीत फेकून दिले. राहत्या घरातमध्ये हिस्सा आणि रेशनकार्डवरील धान्य मिळत नसल्याने सख्ख्या भावाचे कुटुंब संपवल्याची कबुली त्याने दिली. त्याने तिघांचा नाही, तर चौघाचा खून केला आहे. कारण, मृत माधुरी ही सात महिन्यांची गरोदर होती.

कर्जत पोलीस विभागीय अधिकारी धुळा टेळे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, नेरळचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांच्यासह त्यांच्या पथकाने अथक परिश्रम घेत गुन्ह्याचा तपास करुन आरोपीला अटक केली.

## ऑईल कारखान्यात आग

नसतानाही अनधिकृत कंपनी चालू असल्याने या कंपनी मालकावर कारवाईची मागणी होत आहे. खालापूर तालुक्यातील कुंभिवली ग्रामपंचायत हाद्दीत विजय प्रीत कंपनीत वाहनांच्या टायरची पावडर बनवून केमिकल्स मिश्रण करून ऑइल बनविण्याची प्रक्रिया करून उत्पादन करणारा कारखाना आहे. कंपनी मालकाने ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी न घेता अनाधिकृतपणे कंपनी चालवत आहे. ग्रामपंचायतीचे उपसरपंच तुषार ज्ञानेश्वर गायकवाड यांनी मागील वर्षीच कंपनीच्या विरोधात प्रदुषण मंडळाकडे तक्रार केली आहे. तरीही चोराटी पध्दतीने कंपनी चालू होती. याविरोधात पुन्हा लढा देणार असल्याची प्रतिक्रिया तुषार गायकवाड यांनी दिली.

## ..निवड यादी प्रसिध्द

२६९ आणि १२२ स्त्री असे एकूण ३९१ उमेदवार पात्र ठरले आहेत. चालकांसाठीच्या परीक्षेत २३ पुरुष आणि ८ स्त्री उमेदवार असे एकूण ३१ उमेदवार, तर दोन्ही मिळून ४२२ उमेदवार पात्र ठरले आहेत. अधिक माहिती रायगड पोलिसांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## ... आघाडीलाच बहुमत

जाहीर करण्यात आले आहेत. लोकपोलनं त्यांच्या अधिकृत एक्स अकाऊंटवर हे निष्कर्ष जाहीर केले असून, त्यानुसार महाराष्ट्रात महाविकास आघाडी बहुमत मिळवू शकेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच, महायुतीला दुसऱ्या क्रमांकाच्या जागा मिळतील, मात्र त्या सत्तास्थापनेसाठी अपुऱ्या असतील, असंही या निष्कर्षांमध्ये दिसून आल्याचा दावा लोकपोलकडून करण्यात आला आहे.

कसा करण्यात आला सर्व्हे?

लोकपोलनं या निष्कर्षांबरोबरच हा सर्व्हे नेमका कसा करण्यात आला होता? याची माहिती दिलेली आहे. त्यानुसार, प्रत्येक विधानसभा मतदारसंघामधून ५०० मतदार अशा प्रकारे राज्यभरातील मतदारसंघातून जवळपास दीड लाख मतदारांचा या सर्व्हेमध्ये समावेश करण्यात आला होता. मतदार निवडण्यासाठी प्रत्येक मतदारसंघातील ३० मतदान केंद्रं निवडण्यात आली. २० ते ३० ऑगस्ट या १० दिवसांमध्ये हा सर्व्हे करण्यात आला. राज्यभरातल्या एकूण आकडेवारीप्रमाणेच महाराष्ट्रात विभागनिहाय निकाल कसा दिसू शकेल, याचाही अंदाज या सर्व्हेमध्ये वर्तवण्यात आला आहे. निवडणुकीच्या जवळपास दोन महिने आधी करण्यात आलेल्या या सर्व्हेमधून निवडणुकीनंतर काय चित्र असू शकेल, याचे अंदाज वर्तवण्यात आले आहेत.

## ...डेंग्यूचा विळखा!

या यंत्रणेची धावाधाव सुरु झाली आहे. ऐन गणेशोत्सवात डेंग्यू वाढल्याने आरोग्य विभागाची झोप उडाली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून कधी ऊन, कधी पाऊस असे वातावरण निर्माण झाले आहे. या पावसामुळे अनेक सखल भागात पाणी साचून राहिले आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भावदेखील वाढू लागला आहे. जिल्ह्यातील पनवेल, अलिबागबरोबरच आता पेण तालुक्यातदेखील डेंग्यूचे रुग्ण सापडत आहे. हिवताप विभागामार्फत रक्ताचे नमुने घेऊन तपासणी केली जात आहे. तपासणीत डेंग्यू पॉझिटीव्ह कमी सापडत असले, तरी दर दिवशी २०हून अधिक डेंग्युचे रुग्ण आढळून येत आहे.

जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात कळंबोळी, खारघर, नवीन पनवेल, सुकापूर, विचुंबे तसेच पनवेल शहराबरोबरच पेणमधील रावे, अलिबागमधील भाल, साखर या भागात सोमवारी एका दिवसात ३६ रुग्ण सापडले आहेत. तसेच मंगळवारी २०हून अधिक रुग्ण सापडल्याची माहिती समोर येत आहे. हे रुग्ण जिल्हा रुग्णालयासह पेणमधील उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालयांत उपचार घेत आहेत. जिल्ह्यात डेंग्यूचे रुग्ण वाढत असल्याने आरोग्य विभागाचीदेखील धावाधाव सुरु झाली आहे. ज्या ठिकाणी रुग्ण सापडत आहेत, त्या ठिकाणी यंत्रणेद्वारे तपासणी करून परिसरात कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन केले जात आहे. गावागावात जनजागृती केले जात असल्याचे सांगण्यात आले आहे. इतक्या उपाययोजना करूनदेखील शहराबरोबरच आता डेंग्यूने ग्रामीण भागातदेखील शिरकाव केला आहे.

**डेंग्यू रोखण्यासाठी हे उपाय**

घरांच्या परिसरात अथवा टेरेसवर पडलेल्या रिकाम्या कुंड्या, प्लॅस्टिकच्या वस्तू, टायर यासारख्या वस्तूंमध्ये पावसाचे पाणी साचून त्यात डासांची उत्पत्ती स्थाने निर्माण होतात. अशी ठिकाणे नष्ट करावीत. सखल भागात साचलेले पाणी काढून तो भाग कोरडा करावा. खिडक्यांना जाळ्या बसवून घरात डासांच्या शिरकावास प्रतिबंध करावा. आपल्याला डास चावणार नाहीत यासाठी सर्वतोपरी बंदोबस्त करावा. आजाराची लक्षणे आढळून आल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असा मोलाचा सल्ला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला आहे.

## आपटेच्या कोठडीत वाढ

येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी घडली होती. याप्रकरणी मुख्य संशयित आरोपी जयदीप आपटे याची अजून चौकशी करायची असल्याने सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी सरकारी पक्षाच्या वतीने न्यायालयात करण्यात आली. त्यानुसार न्यायाधीश एम.आर. देवकाते यांनी आपटेला १३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी तर चेतन पाटील याला न्यायालयीन कोठडी सुनावली.

## अन्न व औषध प्रशासन ॲक्शन मोडमध्ये

असल्याबाबत अहवाल प्राप्त करून घ्यावा, तयार अन्नपदार्थ हे स्वच्छ व सुरक्षित ठिकाणीच व्यवस्थित झाकून ठेवावेत, आजारी व्यक्तीने अन्नपदार्थ हाताळू नयेत, मिठाई तयार करताना केवळ फूडग्रेड खाद्यरंगाचा अत्यल्प प्रमाणात वापर करावा (१०० पीपीएमपेक्षा कमी), अन्नपदार्थ ग्राहकांना देताना, अन्नपदार्थ पॅकिंग करताना वर्तमानपत्राचा वापर करू नये, बंगाली मिठाई २४ तासांच्या आत खाण्याबाबत ग्राहकांना स्पष्ट निर्देश देण्यात यावेत, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. मिठाई बनविताना तसेच हाताळणाऱ्या व्यक्तींनी नेहमी डोक्यावर टोपी, मास्क, हातमोजे व स्वच्छ ॲप्रन वापरावे, मिठाईवर वापरला जाणारा सोनेरी व चांदीचा वर्ख योग्य दर्जाचा व उच्च प्रतीचा असावा, मिठाई हाताळताना हात वारंवार स्वच्छ धुवावे, अन्न व्यावसायिकांनी त्यांच्या आस्थापनेचे पेस्ट कंट्रोल करून घ्यावे व त्याचा अभिलेखा ठेवावा, आस्थापनेत कार्यरत अन्न हाताळणाऱ्या व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करून घ्यावी व त्याचा अभिलेखा ठेवावा, अन्न आस्थापनेत २५ कर्मचाऱ्यांच्या मागे एक असे फोस्टॅक ट्रेनिंग प्राप्त फुड सेफ्टी सुपरवायझर नियुक्त करावा, अशा सूचनादेखील अन्न व औषध प्रशासन विभागाने केल्या आहेत. अन्नपदार्थाच्या दर्जाविषयी ग्राहकांना कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास प्रशासनाच्या टोल फ्री १८०० २२२३६५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## ...शहरात पाणीटंचाई

नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी लाईट नसल्याने पेज नदीवरील पाणी जलकुंभापर्यंत उचल करण्यात अडथळा येत असल्याचे सांगतात. परंतु, गेली अनेक वर्षे फक्त आणि फक्त विजेचे हे एकमेव कारण पुढे करून आपले दुखणे दुसऱ्याच्या माथी मारण्याचा प्रकार सध्या कर्जत नगरपरिषदेकडून होताना दिसत आहे.

कर्जतमध्ये लाईट जाण्याचे प्रकार वाढतच आहे. असे असले तरी कर्जत नगरपरिषदेने केवळ महावितरणच्या भरोशावर आपला गाडा न चालवता जनरेटरचा पर्याय अवलंबला तर हे कायमच दुखणं दूर होईल. लाखो रुपये खर्च करून जनरेटर घेतले आहेत, ते धूळ खात पडले आहेत. कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गारवे म्हणतात, पाण्याची टाकी भरायला १५ ते १६ तास लागतात आणि एवढं वेळ जनरेटर चालविणे नगरपरिषदेला परवडत नाही. ही बाब मोठी हास्यास्पद वाटते. जनरेटर घेताना विचार का केला नाही की, यासाठी डिझेल परवडणार नाही. नागरिक घरपट्टी व पाणीपट्टी भरतात, मग त्यांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा केला पाहिजे. अनावश्यक टेंडर काढण्यापेक्षा नागरिकांच्या मूलभूत गरजांसाठी टेंडर काढून जनरेटरसाठी लागणारे डिझेल व इतर सुविधा उपलब्ध केल्यास पाण्याचा प्रश्न काहीअंशी कमी होताना दिसेल. दरम्यान, कर्जतच्या विविध समस्यांसाठी गणेशोत्सव संपला की कर्जत नगरपरिषदेच्या विरोधात मोर्चा काढला जाणार आहे, असा इशारा ॲड. कैलास मोरे यांनी दिला आहे.

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. मंगेश अनंत कुडाळकर यांनी जमीन मालक श्री. संदीप मारुती घरत यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २२/७ | ०.०९.९०<br>पो.ख. ०.००.२०<br>एकूण ०.१०.१० | ०.३९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दूसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. १९/०९/२०२४

कळावे
**ॲड. वैभव अशोक शिंदे**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि.
दुसरा मजला, ब्लॉक नं. १०,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, पिन ४१०२०१.
मो. ७७४४८५१४६९/७०५८८५१२२१

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
**Yadavrao Tasgaonkar Institute of Engineering and Technology**
Approved by AICTE & DTE, Affiliated to University of Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytiet.com, principal.ytiet@tasgaonkartech.com

**ADMISSION NOTIFICATION Against Cap Vacancy (ACAP)**

**Applications are invited for Admission to Direct Second Year Bachelor of Engineering (DSE) Against Cap Vacancy (ACAP) for various courses for academic year 2024-25.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Computer Engineering | 0314724510 | 10 |
| 2 | Information Technology | 0314724610 | 8 |
| 3 | Artificial Intelligence & Machine Learning | 0314792110 | 6 |
| 4 | Data Science | 0314791710 | 12 |
| 5 | Electrical Engineering | 0314729310 | 7 |
| 6 | Mechanical Engineering | 0314761210 | 34 |
| 7 | Civil Engineering | 0314719110 | 19 |

The schedule of admission procedure is as follows,

7) Issue of application form at Office: **09.00 am to 4.00 pm from 11th of September 2024 to 12th of September 2024.**
8) Submission of Completely filled application form: **10.00 am to 5.00 pm from 11th of September 2024 to 12th of September 2024.**
9) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **10.00 am on 13th September 2024.**
10) Sale of Admission form with Information Brochure: **10.30 am to 03.00 pm from 13th of September 2024 to 14th September 2024.**
11) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **11.00 am to 05.00 pm from 13th of September 2024 to 14th September 2024.**
12) Cost of Information Brochure with Admission form: **INR 300/- only.**

For any queries contact to **9967640120 / 7972583349**

Sd/
Principal
Yadavrao Tasgaonkar Inst. of Engg. & Technology

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
**Yadavrao Tasgaonkar College of Engineering and Management**
Approved by AICTE & DTE, Affiliated to University of Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytcem.com, principal.ytiet@tasgaonkartech.com

**ADMISSION NOTIFICATION Against Cap Vacancy (ACAP)**

**Applications are invited for Admission to Direct Second Year Bachelor of Engineering (DSE) Against Cap Vacancy (ACAP) for various courses for academic year 2024-25.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Computer Engineering | 0322024510 | 08 |
| 2 | Information Technology | 0322024610 | 04 |
| 3 | Artificial Intelligence & Machine Learning | 0322092110 | 23 |
| 4 | Cyber Security | 0322025210 | 18 |
| 5 | Electronics & Telecommunication Engineering | 0322037210 | 23 |
| 6 | Mechanical Engineering | 0322061210 | 57 |
| 7 | Civil Engineering | 0322019110 | 58 |

The schedule of admission procedure is as follows,

7) Issue of application form at Office: **09.00 am to 4.00 pm from 11th of September 2024 to 12th of September 2024.**
8) Submission of Completely filled application form: **10.00 am to 5.00 pm from 11th of September 2024 to 12th of September 2024.**
9) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **10.00 am on 13th September 2024.**
10) Sale of Admission form with Information Brochure: **10.30 am to 03.00 pm from 13th of September 2024 to 14th September 2024.**
11) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **11.00 am to 05.00 pm from 13th of September 2024 to 14th September 2024.**
12) Cost of Information Brochure with Admission form: **INR 500/- only.**

For any queries contact to **8862023274 / 9325831661**

Sd/
Principal
Yadavrao Tasgaonkar College of Engineering and Management

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या निर्देशांनुसार, खालील परिशिष्टात सविस्तरपणे नमूद केलेल्या शेतजमिनींसंदर्भात आम्ही सदरहू शेतजमिनींच्या मालकांच्या नामाधिकारांची तपासणी करीत आहोत सदरहू मालकांची नावे खालील परिशिष्टामध्ये त्यांनी धारण केलेल्या जमिनीच्या वर्णनाशेजारी नमूद केलेली आहेत. सदरहू शेतजमिनींमध्ये किंवा त्यांच्या कोणत्याही भागामध्ये कोणाही व्यक्तीचा हक्क, नामाधिकार, हिस्सा, हितसंबंध, अधिकार वा दावा-जसे की विक्री, हस्तांतर, अभिहस्तांतरण, गहाण, ताबा, धारणाधिकार, भाडेपट्टा, विश्वस्तव्यवस्था, भेट, हक्क, वारसा, देखभाल, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, वहिवाटीचा हक्क, कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा हुकूम किंवा कोणत्याही प्रकारचा करारनामा वा अन्य कोणत्याही प्रकारे, असल्यास निम्नस्वाक्षरीकरांना त्यांच्या खालील नमूद पत्त्यावर दाव्यांच्या पृष्टर्थ्य दस्तऐवजी पुराव्यांसह सदरहू जाहीर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीमध्ये कळविणे आवश्यक आहे; अन्यथा सदरहू शेतजमिनींमध्ये खालील परिशिष्टमध्ये नमूद केलेल्या व्यक्तिंव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तींचा कोणत्याही प्रकारचा हक्क, नामाधिकार, हितसंबंध अथवा दावा नाही किंवा त्यांचा त्याग केल्याचे / सोडून दिल्याचे समजण्यात येईल.

**जमिनीचे परिशिष्ट**

**गाव:** आमणोरी, तालुका: सुधागड, जिल्हा : रायगड येथे स्थित असलेली शेतजमीन जिचे सर्व्हे क्र., क्षेत्रफळ, आकार, वर्ग व मालकी अधिकार खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत.

| सर्व्हे नं | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार रुपये | वर्ग | जमीनमालक |
|---|---|---|---|---|
| ३४/१ | ०-१४-२९ | १.८१ | १ | कृष्णा तुकाराम गायकवाड<br>जनाबाई तुकाराम गायकवाड |
| ३५/१ | ०-२४-५० | ३.५० | १ | कृष्णा तुकाराम गायकवाड<br>जनाबाई तुकाराम गायकवाड |
| ३५/२ | ०-५२-६० | ९.०० | १ | किसन भिवराम जाधव |
| ३५/३ | ०-७०-६० | १२.०२ | १ | आकाश नामदेव काकडे<br>रुणाली नितीन काकडे<br>रुचिता नितीन काकडे<br>रेवती नितीन काकडे |
| ४९/५ | ०-१६-२० | २.०० | १ | यशवंत चंदर गायकवाड<br>कृष्णा चंदर गायकवाड |
| ३४/२ | ०-२३-९० | २.२२ | १ | दत्ता गेणू साळुंखे |
| ३४/३ | ०. १२.५० | २.०० | १ | दत्ता गेणू साळुंखे |

**दिनांक ११ सप्टेंबर, २०२४**

सही/-
**कदम आणि कंपनी वकील**
३०५-३०६, ३रा माळा, युसूफ बिल्डींग,
महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

### अलिबाग नगरपरिषद

**फेर जाहिर निविदा**

मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद, अलिबाग - रायगड खाली नमूद केलेल्या कामांसाठी पुरवठादाराकडून दुरुस्ती करणेकामी निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचा तपशिल | इसारा रक्कम धनाकर्षाव्दारे | निविदा फॉर्म फी | निविदा फॉर्म मिळण्याची व भरण्याची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | पाणी टँकर MH0-6391 दुरूस्ती करणेबाबत | १०००/- | १००/- | ११.०९.२०२४ ते १९.०९.२०२४ पर्यंत वेळ सकाळी ११.०० ते सायं ४.३० पर्यंत |
| २ | जेसीबी व पाणी टँकर टायर टयूब पुरविणेबाबत | १०००/- | १००/- | |
| ३ | नगरपरिषदेकडील वर्ग- ४ कर्मचाऱ्यांना गणवेश शिवून देणेबाबत | १०००/- | १००/ | |

सुचना :- १) कामाबाबत अधिक माहिती निविदा फॉर्म मध्ये देण्यात आलेली असून नगरपरिषद कार्यालयात आरोग्य विभागात उपलब्ध होईल.
२) देकारपत्र द्विलिफाफा पध्दतीने सादर करण्याचे असून लिफाफा नं.१ मध्ये पात्रते याबाबतची कागदपत्र व लिफाफा नं. २ मध्ये वित्तीय बोलिचा फॉर्म सादर करण्याच्या आहे.
३) राष्ट्रीयकृत बँकांकडील धनाकर्षाने इसारा रक्कम भरण्यात यावी.

सही/-
**(अंगाई साळुंखे)**
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद.**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेला कळवण्यात येते की, माझे अशील श्री. किशोर शिवाप्रसाद तिवारी यांच्या मालकिची एक सदनिका आहे त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :- सदनिका क्र. ००५ तळ मजला, वृंदावन कॉम्प्लेक्स सीएचस लि., सी विंग, मौजे मुद्रे बुद्रुक ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१. सदर सदनिका माझ्या अशीलांन त्यांच्या आई मिनाक्षी शिवप्रसाद तिवारी यांचे कडून बक्षीसपत्रने मिळाली आहे व मिनाक्षी शिवप्रसाद तिवारी यांनी सदर सदनिका विजय लक्ष्मण सावंत आणि शारदा विजय सावंत यांचेकडून दस्त क्र. २३१२/२०१८, दि. ३०/०५/२०१८ रोजी करारनामा करून खरेदी केली. सदर सदनिका विजय लक्ष्मण सावंत आणि शारदा विजय सावंत यांनी शगुन रिअँटी इंटरप्राइज शेयर जुजर कालाभाई झोजवाला या संस्थेकडून दस्त क्र. ७३७०/२००८, दि. २३/१०/२००८ रोजी करारनामा करून खरेदी केली सदर करारनाम्यांच्या मूळ प्रती माझे आशील त्यांच्या आई सोबत कर्जत बाजारपेठेत प्रवासादरम्यान पडून गहाळ झाले आहे व त्याबाबत त्यांनी कर्जत पोलिस स्टेशन येथे तक्रार नोंदवली असून त्या तक्रारीचा केस नं ०४८०/२०२४ असा आहे. म्हणून सदर गहाळ झालेल्या करारनाम्यांच्या मूळ प्रती व सदर सदनिकेबाबत कुणाची हरकत, दावा, तक्रार, तारण, गहाण, दान, बोजा, पोटगी वा अन्य तत्सम कोणत्याही बोजाचा, वहिवाटीचा दावा असल्यास त्या व्यक्तींनी, संस्थांनी त्यांच्याकडे असणाऱ्या कागदोपत्रांसह लेखी हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर सादर करावी विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती, दाव्यांची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

वर उल्लेख केलेल्या सदर करारनाम्यांच्या मूळ प्रती व सदर सदनिकेच्या अनुशंगाने काही संपर्क साधावयाचा असल्यास पुढील पत्त्यावर साधावा. ही जाहीर नोटीस जनहितार्थ प्रसिध्द केली. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कर्जत
दिनांक ११/०९/२०२४
**ॲड सौ. शुभांगी आनंद साळवी**
सरमोकादम बंगलो, कर्जत दिवाणी व फौजदारी न्यायालया समोर,
गाळा क्र.०२, कर्जत, रायगड. ४१०२०१.
मो. ९९६७८३४६१८.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत मी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव. | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| नरेश परशुराम भोईर | १/अ/१/अ | ११ | ३-४८-०० | १०=०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीऩ, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन मी सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करेन. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- ११/९/२०२४

खरेदीदार
**राहुल प्रल्हाद डाळींबकर**
रा. बुद्धनगर कर्जत
ता. कर्जत जि. रायगड
मो. ९८२२६६५८७२

### महाराष्ट्र शासन - आरोग्य सेवा

**जिल्हा क्षयरोग केंद्र, रायगड अलिबाग**
**राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम**
**तालुका आरोग्य अधिकारी कर्जत, जि. रायगड**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत तालुक्याच्या क्षेत्रामधील येणाऱ्या विविध आरोग्य संस्थांमधून संशयीत क्षयरूग्णांना खाजगी वैद्यकीय व्यवसायीकांकडून क्ष-किरण तपासणी सुविधा उपलब्ध करून देणेबाबत दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

सदर ‘क्ष’ किरण छातीचा फोटो/पोर्टेबल २४X७ चोवीस तास सेवा देण्यात येणाऱ्यांकडून दिनांक १७/०९/२०२४ या कालावधीत मा. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय कर्जत, जि. रायगड पत्त्यावर निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांकडून आपल्या निविदा पाठविण्यात याव्यात.

सही /-
**तालुका आरोग्य अधिकारी**
**कर्जत, जि.रायगड**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने यांत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिलांच्या व राजेश यशवंत पाटील यांच्या सामाईक मालकीची मिळकत आहे. तसेच सदरची मिळकत ही आमचे अशील व राजेश यशवंत पाटील यांच्या ताबेकब्जा वहिवाटीत व अखंड कसवणुकीत आहे. सदरची मिळकत ही सामाईक असून सदर मिळकतीचे आजपर्यंत हिश्शे झालेले नाहीत. परंतु सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी मालक म्हणून राजेश यशवंत पाटील यांच्या नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवून सदरची मिळकत इतर त्रयस्थ इसमास आमचे अशिलांच्या अपरोक्ष त्यांचे हक्क डावलून विकण्याच्या तयारीत आहेत. तरी आमचे अशीलांच्या अपरोक्ष कोणीही कोणताही व्यवहार सदर मिळकतीबाबत सदर राजेश यशवंत पाटील वा इतर कोणत्याही व्यक्तीशी कोणताही व्यवहार करू नये त्यास आमच्या अशिलांशी माझी सक्त हरकत आहे.

तरी सदरहू मिळकतीसंदर्भात वर नमूद आमच्या अशिलांचे हक्कास बाधा न येता कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार करू नये. तसा कुठलाही व्यवहार आमचे अशिलांचे अपरोक्ष केल्यास व आमचे अशिलांचे हक्कास कमीपणा येईल असा व्यवहार केल्यास त्या व्यवहारास आमच्या अशिलांची सक्त हरकत असेल. व तसे केल्यास सदर व्यक्ती सदर मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार (Bonafide Purchaser ) होणार नाहीत. तसेच अशा प्रकारचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व असा कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास भविष्यातील कोर्टकारवाईस संबंधीत ईसम जबाबदार राहतील हे कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| हेमनगर ता. अलिबाग | १४२/१ | ०-१४-८०<br>पो.ख ०-००-२०<br>एकूण ०-१५-०० | ३-८२ |

अलिबाग,
दि. १०/०९/२०२४

सही/-
**ॲड. आर.आर.कुलसंगे**
**जिल्हा न्यायालय**
**अलिबाग - रायगड**

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४



































● स्वप्नील जालिंदर मोरे, कुर्ले (बागाचा कोंड) महाड यांच्या निवासस्थानी गणपतीची आकर्षक मुर्ती



● महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांच्या घरातील गणरायाची त्रिशुलधारी मुर्ती



● पुजा शिरसागर, दिव ता. पेण, जि. रायगड यांच्या घरातील श्रीगणेशाची मुर्ती.




● भालचंद्र गणपत ठाकूर, दिव, ता. पेण, जि. रायगड यांच्या घरातील श्रीगणेशाची मुर्ती.











● सागर दिलीप म्हात्रे (थळ-पारोडा) यांच्या घरातील खंडोबा रुपी सुबक गणपती



● श्री. सुगम पांडूरंग म्हात्रे किहीम यांच्या येथील श्री गणरायाची प्रसन्न सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● श्री. प्रशांत यशवंत दळवी, किहीम यांचे निवासस्थानी गणेशाची नयनरम्य सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● मुरुड येथील श्री. अभिजीत ठाकूर यांच्या निवासस्थानी देवीच्या सात्विक रुपच नव्हे तर तर वेळ आली तर तामसिक रुप समान देखील व्हावे या वर आधारित आहे. (छायाचित्र : सौरभ नाझरे)



● मापगाव कुंभार समाज अध्यक्ष श्री. सुनील कैलकर मापगाव, अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीची आकर्षक मुर्ती (छाया : अब्दुल सोगावकर)



श्री. मोहन खोत आणि परिवार मु. मापगाव ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीची आकर्षक मुर्ती (छाया : अब्दुल सोगावकर)

# 'अंतराळगौरी'ची कहाणी

मंगळवारी घरोघरी गौरी आल्या. दोन दिवस त्यांचे माहेरवाशिणींसारखे आगत-स्वागत व सत्कार होईल. पण याच दरम्यान भारतीय वंशाची असलेली एक गौरी दूर अंतराळात अडकली आहे. ती तिच्या माहेरी म्हणजे पृथ्वीवर सुखरुप परत यावी यासाठी सर्व जण प्रार्थना करीत आहेत. आजच्या गौरीपूजनाच्या निमित्ताने तिच्याविषयी बोलायला हवे.या गौरीचे नाव आहे सुनीता विल्यम्स. सध्या तिचे वास्तव्य पृथ्वीपासून सुमारे चारशे किलोमीटर दूर अवकाशामध्ये आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रामध्ये आहे. येत्या फेब्रुवारीपर्यंत तिलाकाहीसेसक्ताने तेथेच राहावे लागणार आहे.जूनमध्ये ती अंतराळात गेली तेव्हा खरे तर ती आठ दिवसात परत येणार होती. पण तिला घेऊन येणाऱ्या यानात बिघाड झाला. त्यामुळे दुसरे यान येईपर्यंत तिला वाट पाहावी लागणार आहे.गावाहून तालुक्याला जाणारी शेवटची एसटी बिघडावी आणि दुसऱ्या दिवशी दुसरी गाडी येईपर्यंत गावातच मुक्काम करावा लागावा तशी पाळी सुनीतावर आली आहे. अंतराळात इतके दिवस राहाणे ही सोपी किंवा गमतीची गोष्ट नाही. पण सुनीता आणि तिचा सहकारी बूचविलमोर यांना ते करावे लागणार आहे. त्या दरम्यान पृथ्वीवरच्या नासा व इतर अंतराळ संशोधन संस्थांमधील शास्त्रज्ञांचा त्यांच्याशी संपर्क असेल. पण हा सर्व दूरस्थ मामला असेल. सुनीता आणि विलमोर हे दोघेबोईंग कंपनीच्या स्टारलायनर यानाने जून महिन्यात अंतराळ संशोधन केंद्रात गेले. मात्र परतीच्या वेळी या यानामधून हेलियम वायूची गळती होत असल्याचे आढळले. हे धोकादायक होते. कारण पृथ्वीवर परत येताना अशा बिघडलेल्या यानाचा स्फोट होऊ शकतो. यापूर्वी कोलंबिया अवकाशयानाचा असा झालेला अपघात काही जणांना आठवत असेल. त्या अपघातातच मूळची भारताची असलेली कल्पना चावला मरण पावली होती. कोलंबिया हे पृथ्वी आणि अंतराळ असा शटल प्रवास करणारे यान होते.

### कल्पना चावलाची आठवण

१९८१ मध्ये त्याने पहिला प्रवास केला. त्यानंतर २८ वेळा ते अंतराळात गेले व पृथ्वीभोवती त्याने चार हजार प्रदक्षिणा केल्या. शेकडो अंतराळवीरांची व शास्त्रज्ञांची ने-आण त्याने केली. २००३ मध्ये पृथ्वीवर परतत असताना त्याला अपघात झाला. जमिनीपासून शंभर किलोमीटर उंचीपर्यंत पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव जाणवतो. त्यानंतर तो जवळपास संपतो. त्या पलिकडच्या प्रदेशाला बाह्य अवकाश किंवा आउटर स्पेस असे म्हणतात. एखादे यान या प्रदेशातून पृथ्वीवर जेव्हा परत येते तेव्हा या गुरुत्वाकर्षण सुरू होण्याच्या हद्दीवर त्याच्यावरचा दाब एकदम वाढतो व प्रचंड घर्षण होते. कोलंबिया वाहनाचा याच घर्षणामुळे स्फोट झाला व त्यातील सर्व यात्री ठार झाले. त्यामध्ये कल्पना चावलाचाही समावेश होता. कोलंबियाच्या अपघातानंतर नासाच्या संशोधन मोहिमांना काहीसा ब्रेक लागला. कारण एक यान नष्ट होणे म्हणजे अब्जावधींचा फटका तर होताच, पण शास्त्रज्ञ व अंतराळवीरगमावण्याचेनुकसानहीमोठेहोते. साहजिकचआता सुनीता व विलमोर यांच्या बाबतीतकोणताही धोका पत्करण्यास नासा तयार नाही. त्यामुळे जून महिन्यापासून याबाबत खल चालू होता. अखेर सुनीता व विलमोर यांना न घेताच यानाने परत यावे असे ठरले. त्यानुसार शुक्रवारी रात्री ते पृथ्वीवर परतले. अंतराळ संशोधनावर मधल्या काळात अमेरिकी सरकारने बरीच कपात केली. २००८ च्या मंदीचाही त्याला फटका बसला. तेव्हापासून खासगी कंपन्यांनी अंतराळयाने तयार करावीत व नासाच्या मदतीने ती पाठवावीत असा प्रस्ताव पुढे आला. टेस्ला या कार कंपनीचा व आता ट्विटरचा देखील मालक असलेल्या एलॉनमस्क याने यात बरीच आघाडी घेतली. त्याच्या स्पेसएक्स या कंपनीने अशी याने पाठवून अंतराळ पर्यटन सुरू करण्याचे ठरवले. तशी काही याने जाऊनही आली आहेत. नंतर बोईंग ही जगप्रसिध्द अमेरिकी विमान कंपनीयात उतरली. सुनीता व विलमोरबोईंगच्याचस्टारलायनर या यानाने अंतराळात गेले.

### सुखरुप यावी ही प्रार्थना

मात्र हे यान उडण्याआधीपासूनच त्यात तांत्रिक दोष असल्याची चर्चा होती. त्यामुळे हे उड्डाण पुढे ढकलावे लागले होते. आता सुनीताला न घेताच परतल्याने कंपनीची बऱ्यापैकी नाचक्की झाली. या प्रकारामुळे अंतराळात फिरायला जाऊ किंवा चंद्रावर जाऊन राहू वगैरे श्रीमंताच्या कल्पनांच्या उड्डाणांना ब्रेक लागणार आहे. अंतराळ संशोधनामध्ये मात्र यामुळे काहीही खंड पडू नये अशी आशा आहे. कर्करोगावरील उपचारापासून ते शेतात पाणी अडवण्यापर्यंत अनेकविध गोष्टींवर बाह्य आकाशात हे संशोधन होत राहते. त्याचा उपयोग सर्व मानवजातीसाठी होत असतो. पृथ्वीवर एकमेकांचे शत्रू असलेल्या देशांना या संशोधनासाठी अंतराळात का होईना, पण एकत्र यावे लागत असल्याचे दिसते. अंतराळातील प्रयोगशाळा किंवा स्पेस स्टेशन हे अशा ऐक्याचे उदाहरण आहे. १९९८ मध्ये अंतराळात सोडण्यात आलेले हे आंतरराष्ट्रीय केंद्र उर्फ प्रयोगशाळा आजतागायत उत्तम रीतीने चालू आहे. इसवी सन दोन हजारपासून, म्हणजे गेली चोवीस वर्षे सातत्याने त्यावर कोणी ना कोणी शास्त्रज्ञ राहून प्रयोग करीत आहेत. हे केंद्र अमेरिका, रशिया, जपान, युरोप व कॅनडा यांच्या संयुक्त खर्चाने व प्रयत्नाने बांधण्यात आले आहे. दर चोवीस तासात सोळा वेळा ते पृथ्वीला प्रदक्षिणा घालते. तेथे गुरुत्वाकर्षणशून्यवत असल्याने हवेत तंरगत राहून संशोधनासह सर्व गोष्टी कराव्या लागतात. त्या अवस्थेत राहण्याने शरिरावर बराच परिणाम होतो. त्यामुळे तेथेही ठराविक व्यायाम करावा लागतो. खाणेपिणेही वेगळ्या रीतीने घ्यावे लागते. सुनीता भारताची आठवण म्हणून तेथे सामोसा घेऊन गेली आहे. तिने प्रयोगशाळेच्या बाहेर पडून एकटीने पन्नास तासांहून अधिक काळ अंतराळात चालण्याचा पराक्रम केला आहे. आणखी नऊ दिवसांनी म्हणजे येत्या १९ सप्टेंबरला ही अंतराळगौरी ५९ वर्षे पूर्ण करून साठाव्या वर्षात प्रवेश करील. अमेरिकी नौदलात पायलट म्हणून काम केलेली सुनीता मनाने कणखर आहेच. शिवाय, आजवरच्या अनेक भराऱ्यांचा अनुभव तिच्या गाठीशी आहे. तिने सुखरुप परत यावे अशी सर्वांचीच इच्छा व प्रार्थना असेल.

विचार

# रिलायन्स-डिस्ने विलीनीकरण : फायदा कुणाला ?

***रिलायन्स आणि डिस्ने या दोन मोठ्या मनोरंजन कंपन्यांच्या विलीनीकरणामुळे, डिस्ने स्टारचे ८० आणि रिलायन्स वायकॉम १८ चे ४० असे १२० चॅनेल्स नव्या कंपनीकडे असतील. हॉटस्टार हे डिस्नेचे ओटीटी ॲप आहे तर जिओ सिनेमा रिलायन्सचे एक लोकप्रिय ओटीटी माध्यम आहे. मर्जरमुळे ही भारतातील सर्वात मोठी मनोरंजन कंपनी ठरेल. भारतभरात या कंपनीचे ७५ कोटी दर्शक असतील असा अंदाज आहे.***



मेधा इनामदार

भारत ही जगाची बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. क्षेत्र कोणतेही असो, सर्व देशांना आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यांना भारताने आकर्षित केले आहे. गेल्या काही काळात मनोरंजन क्षेत्र हे फार मोठे आणि महत्वाचे क्षेत्र बनले आहे. भरपूर पैसा आणि खात्रीची बाजारपेठ यांच्या आकर्षणामुळे अनेक लहानमोठ्या कंपन्यांनी या क्षेत्रात प्रवेश केला आणि मोठ्या वेगाने जमही बसवला. अर्थातच या क्षेत्रातली स्पर्धाही प्रचंड प्रमाणात वाढली. आज असंख्य चॅनेल्स आणि अगणित प्रॉडक्शन कंपन्या देश-परदेशातल्या विविध भाषिक प्रेक्षकांची करमणूक करण्यात व्यस्त आहेत. रिलायन्स आणि डिस्ने या अशाच महाप्रचंड कंपन्या अनेक चॅनेल्स आणि ओटीटी प्लॅटफॉर्मच्या मार्गाने मनोरंजन क्षेत्रात कार्यरत आहेत. अर्थात आता आहेत म्हणण्यापेक्षा होत्या असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. कारण २९ ऑगस्टला या दोन्ही कंपन्यांचे एकीकरण करण्यासाठी भारतीय स्पर्धा आयोगाने (सीसीआय) ने मान्यता दिली. विशेष म्हणजे रिलायन्स इंडस्ट्रीजच्या सर्वसाधारण सभेच्या आदल्याच दिवशी ही मान्यता मिळाल्यामुळे एकत्रीकरणाची ही प्रक्रिया आता लवकरच सुरू होईल यात शंका नाही. एनसीएलटीची मान्यताही आता लवकरच अपेक्षित आहे आणि त्यानंतरच प्रत्यक्ष एकीकरणाची प्रक्रिया सुरू होईल. २०२५ या वर्षात हे एकीकरण पूर्ण होऊन ग्राहकांना लाभ मिळू लागेल.

रिलायन्स आणि डिस्नेसारख्या कंपन्यांनी हे पाऊल उचलले आहे, त्याचा थेट फायदा कुणाला मिळणार ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. प्रत्यक्षात या दोन्ही कंपन्या ओटीटीवर बराच काळ कार्यरत आहेत, तरीही ॲमेझोन आणि नेटफ्लिक्सला भारतात मोठा ग्राहकवर्ग आहे. त्याखालोखाल सोनी एंटरटेनमेंटने बाजारपेठेत स्वत:चा ग्राहकवर्ग निर्माण केला आहे. गेल्या काही वर्षांपासून डिस्ने हॉटस्टारला भारतात काही अडचणींचा सामना करावा लागतो आहे. त्यातच भारतात डिस्नेचे स्ट्रीमिंग चॅनेल असलेल्या 'हॉटस्टार'ला इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे २०२३ ते २०२७ च्या प्रसारणाचे अधिकार मिळाले नाहीत. केवळ या कारणामुळे ओटीटी वाहिनीने आपले ११.५ दशलक्ष ग्राहक गमावले. परिणामी, कंपनीला जबरदस्त धक्का बसला. गेल्या वर्षीच्या मार्चमध्ये वॉर्नर ब्रदर्सच्या डिस्कव्हरी चॅनेलने गेम ऑफ थ्रोन्स आणि सक्सेशनसारख्या मालिका प्रदर्शित करायला सुरुवात केली. तेव्हा कंपनीला सर्वात जास्त तोटा झाला. त्यामुळे बहुधा या दोन्ही कंपन्यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला असावा. या एकीकरणाच्या करारामुळे या दोन्ही कंपन्यांना आपापल्या धक्क्यांमधून सावरता येईल आणि भारताच्या अत्यंत महत्वपूर्ण बाजारपेठेत पुन्हा एकदा चांगले स्थान प्राप्त होईल. या प्रक्रियेमुळे दोन्ही कंपन्यांच्या खर्चात मोठ्या प्रमाणावर बचत होऊ शकते आणि डिस्नेची परिस्थिती सुधारू शकते. या निमित्ताने सर्वच क्षेत्रात संचार करणाऱ्या रिलायन्सची मुळे मनोरंजनविश्वात मजबूत होतील तर या क्षेत्राच्या अभ्यासकांना वाटते की या एकत्र येण्यामुळे मक्तेदारीसारखी परिस्थिती उद्भवू शकेल.

या दोन्ही कंपन्या एकत्र झाल्यामुळे सोनी, झी एंटरटेनमेंट, नेटफ्लिक्स आणि ॲमेझॉनला स्पर्धक म्हणून मोठे आव्हान निर्माण होणार आहे. डिस्ने आणि रिलायन्स एकत्र येऊन ८.५ अब्ज डॉलर्स म्हणजेच ७० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची मोठी नवी एंटरटेनमेंट कंपनी तयार करणार आहेत. यामुळे सुमारे १२० टीव्ही चॅनेल्स आणि डिस्ने-हॉटस्टार आणि जिओ सिनेमा या ओटीटी वाहिन्यांवर लोकांना मनोरंजनासाठी भरपूर काही बघता येईल. व्हायकॉम १८ कडे बीसीसीआय व्यवस्थापित क्रिकेट सामन्यांचे टीव्ही हक्क आहेत तर रिलायन्सकडे आपल्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर आयपीएल दाखवण्याचे अधिकार आहेत. व्हायकॉम १८ कडे एमटीव्ही, कॉमेडी सेंट्रल, निकलोडियन यासारखे लोकप्रिय चॅनेल्स आहेत. म्हणूनच या दोन कंपन्या एकत्र आल्यामुळे मनोरंजनक्षेत्रात या नव्या कंपनीची मक्तेदारी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विलीनीकरणानंतर स्थापन झालेल्या कंपनीमध्ये रिलायन्सचा ६३.१६ टक्के आणि डिस्नेचा ३६.८४ टक्के हिस्सा असेल. नीता अंबानी नव्या कंपनीच्या अध्यक्ष असतील तर डिस्ने इंडियाचे माजी अध्यक्ष उदय शंकर हे उपाध्यक्ष आणि धोरणात्मक सल्लागार म्हणून काम करतील. विलीनीकरणातून स्थापन झालेल्या नवीन कंपनीकडे टीव्ही आणि स्ट्रीमिंग विभागातील भारतीय जाहिरात बाजाराचा ४० टक्के हिस्सा असेल.

देशातील मनोरंजनक्षेत्रातील हे सर्वात मोठे विलीनीकरण आहे असे म्हणता येईल. हा करार होणार असल्याची चर्चा बरेच दिवसांपासून सुरु होती आणि फेब्रुवारीमध्येच या दोन्ही कंपन्यांनी आपण विलीनीकरण करार करत आहोत, असे जाहीर केले होते. परंतु काही अडचणींमुळे आणि सीसीआयने मागितलेली काही स्पष्टीकरणे देण्यासाठी लागलेल्या वेळामुळे अखेर या दोन्ही कंपन्यांनी आपल्या एकीकरणावर शिक्कामोर्तब केले आहे. नव्या कंपनीचे नाव 'जेव्ही' असेल आणि त्यामुळे मनोरंजनविश्वात एक नवे युग सुरू होईल, असे रिलायन्सचे अध्यक्ष मुकेश अंबानी म्हणाले. रिलायन्स या नव्या कंपनीत सुमारे ११५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून भारतात मिडिया आणि मनोरंजन उद्योगातल्या डिजिटल बदलांचे नेतृत्व करेल, असेही त्यांनी सांगितले. या क्षेत्रात प्रचंड स्पर्धा आहे आणि या एकत्रीकरणामुळे आम्हाला शीर्ष स्थानावर राहण्यासाठी मदत होईल, असे 'डिस्ने'चे बॉब इगर यांनी सांगितले. भारतात डिस्ने हॉटस्टारचे सुमारे ३.६ कोटी ग्राहक आहेत तर रिलायन्सचे १.५ कोटी ग्राहक आहेत. त्यामुळे या दोन्ही कंपन्यांना मिळून कोट्यवधी ग्राहक सुरुवातीपासूनच मिळणार आहेत.

नव्या कंपनीकडून अनेक सुविधा आणि स्वस्त प्लॅन्स जाहीर केले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे 'जेव्ही'चे भारतभरात ७.५ दशलक्षपेक्षा जास्त दर्शक असतील आणि जगभरातील भारतीयांनाही याचा लाभ घेता येईल. विशेष म्हणजे या ग्राहकांसाठी डिस्नेकडून या नव्या कंपनीला तीस हजारपेक्षाही अधिक कार्यक्रमांचा परवाना दिला जाणार आहे. त्यामुळे 'जेव्ही' हा मनोरंजन आणि क्रीडाक्षेत्रातील महितीपट, लघुपट, चित्रपट आणि वेब मालिकांसाठी संपूर्ण भारतात एक फार मोठे टीव्ही आणि डिजिटल स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म असेल. या प्लॅटफॉर्मवर मनोरंजन क्षेत्रातील कलर्स, स्टार प्लस, स्टार गोल्ड आणि क्रीडा क्षेत्रातील स्टार स्पोर्टस आणि स्पोर्टस १८ या सगळ्या चॅनेल्स एकत्र येतील, असे सांगण्यात आले आहे. नव्या कंपनीकडे दोन लाख तासांच्या विविध कार्यक्रमांची मोठी लायब्ररी असेल. त्यात टीव्ही मालिका, चित्रपट आणि क्रीडा कार्यक्रमांचा समावेश असेल. मॉर्गन स्टॅन्ले विश्लेषकांनी जाहीर केले आहे की नवीन संस्थेकडे काही प्रमुख क्रीडा स्पर्धांचे विशेष डिजिटल आणि प्रसारण हक्कदेखील असतील. यात पुढील चार वर्षांच्या आयपीएल, आयसीसी, देशांतर्गत भारतीय क्रिकेट, फीफा विश्वचषक, प्रीमियर लीग आणि विम्बल्डन या क्रीडा स्पर्धांचा समावेश असेल.

क्रिकेट जाहिरातींच्या कमाईवर नवीन कंपनीची मक्तेदारी असेल. तिच्याकडे क्रिकेटव्यतिरिक्त, विम्बल्डन टेनिस चॅम्पियनशिप, मोटो जीपी आणि इंग्लिश प्रीमियर लीगचे प्रसारण हक्कदेखील असतील असा अंदाज आहे. मनोरंजन सेवांसाठी भारत ही एक मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळेच नेटफ्लिक्स, ॲमेझॉनसारख्या अमेरिकन स्ट्रीमिंग कंपन्या भारतीय बाजारपेठेकडे आकर्षित झाल्या आहेत. डिस्ने आणि रिलायन्स देखील ओटीटीवर आहेत. नेटफ्लिक्स आणि ॲमेझोन हे भारतात त्यांच्यासाठी मोठे स्पर्धक आहेत. या कंपन्यादेखील या स्पर्धेत उतरून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी स्वस्त प्लॅन लॉँच करू शकतात.

अर्थातच याचा थेट फायदा प्रेक्षकांना होईल तर डिस्नेचे दर्शक रिलायन्सचे कार्यक्रम पाहू शकतील आणि रिलायन्सच्या दर्शकांना डिस्नेच्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांचा आनंद घेता येईल. या विलीनीकरणाचे इतर कंपन्यांवर, बाजारपेठेवर, मनोरंजनक्षेत्रावर होणारे दीर्घकालीन परिणाम हळूहळू लक्षात येतील. कदाचित यातून स्फूर्ती घेऊन अजून अनेक कंपन्या एकत्र येतील आणि या क्षेत्राचा चेहरामोहरा बदलून टाकतील किंवा या स्पर्धेमुळे एकाधिकारशाही निर्माण होऊन इतर कंपन्या काढता पाय घेतील, याचा अंदाज नजीकच्या भविष्यात येईलच. पण सध्या तरी या एकत्रीकरणाचा लाभ सर्वच भारतीय ग्राहकांना मिळणार आहे आणि या मनोरंजनाच्या बाजारपेठेत निर्माण झालेल्या या नव्या स्पर्धेमुळे त्यांना उत्कृष्ट आणि भरपूर कंटेंट स्वस्तात उपलब्ध होणार आहे, यात शंका नाही.

आजकाल

# वाढवण प्रकल्प : स्थानिकांना किती काळ दूर ठेवणार ?



रमाकांत पाटील

वाढवण बंदराच्या भूमिपूजनासाठी तुम्ही थेट दिल्लीहून पालघर येथे आलात आणि वाढवण येथे प्रत्यक्ष जाऊन भूमिपूजन करण्याऐवजी तुम्ही पालघर येथूनच आभासी पद्धतीने बटन दाबून कोनशिलाचे अनावरण केले.तर मग तुम्ही प्रत्यक्ष वाढवणला जाऊन भूमिपूजन का केले नाही ? असा इथल्या मच्छीमारांसह सर्व स्थानिकांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना सवाल आहे. असे दुरून डोंगर साजरेप्रमाणे दुरून भूमिपूजन साजरे करायचे होते तर ते दिल्ली,मुंबईतून देखील करता आले असते. तसे न करता कोट्यवधीचा खर्च, इथल्या स्थानिक प्रशासनासह, साऱ्यांचा वेळ, शक्ती वाया घालविण्याचे प्रयोजन नक्की काय होते ?

वाढवण येथील हे बंदर रद्द करण्याची भूमिका शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९९८ मध्ये घेतली होती.उध्दव ठाकरे यांना वाढवणला पाठवून, त्यानुसार लोकभावना लक्षात घेऊन वाढवण येथील बंदर रद्द करण्यात आले होते.तत्कालीन शिवसेना-भाजपा युती सरकारचा तो निर्णय होता. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस सोबत महाविकास आघाडी म्हणून सत्ता स्थापन केल्यानंतर शिवसेनेत फूटपाडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना हीच खरी बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना असल्याचे आपण नेहमी सांगत असतात. त्याच बाळासाहेबांचा शब्द पंतप्रधान आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाळता आला नाही. आम्हीच खरे बाळासाहेबांचे वैचारिक वारसदार आहोत असे पदोपदी सांगणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही बाळासाहेबांच्या या आदेशाचा, शब्दाचा विसर पडावा याला काय म्हणायचे ?

वाढवण बंदर आज बनेल, उद्या बनेल असं ३० वर्षांपासून पाहतोय. परंतु मोदींच्या हातूनच भूमिपूजन व्हायचे होते म्हणून कदाचित हे घडले असावे, असे आपल्या भाषणात सांगणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना किमान हे वाढवण बंदर का थांबले होते याचा विसर पडायला नको होता.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात १९९१ च्या प्राधिकरणाच्या अधिसूचनेच्या बाहेर या बंदराला कसे काढले याचा उहापोह आपल्या भाषणात केला. अर्थात हे बंदर रेटून नेण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार मार्फत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या कोणते मार्ग अनुसारले गेले हे इथल्या स्थानिकांना पुरेपुर ठाऊक आहे. प्राधिकरणाच्या तत्कालीन तज्ञ सदस्यांनी सुनावणी दरम्यान स्वत:च प्रश्न उपस्थित केल्यानंतर प्राधिकरणाचे सदस्यच बदलण्यात आले. पुढे सुनावणी पूर्ण झालेली नसतानाच प्राधिकरणाने निर्णय दिल्याची संघर्ष समितीसह अनेकांची तक्रार राहिली, मात्र त्याकडेही सरकारने दुर्लक्ष केले.

बंदरासंबंधीचा मोठा निर्णय घेताना ज्यांच्या जीवनाशी निगडित हा विषय आहे, ते मच्छीमार व अन्य स्थानिक बांधव यांच्याशी आपण चर्चा केली आहे का ? ह्या प्रश्नाचे उत्तर केंद्रीय बंदर व जहाज मंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्याकडे नव्हते. ह्या प्रकल्पाच्या माध्यमातून १२ लाख इतका रोजगार निर्माण होणार असल्याचा दावा आपण सारे करत आहात, मात्र १२ लाखाची ही संख्या आली कोठून ? कोण-कोणत्या मार्गाने हा बारा लाखाचा रोजगार निर्माण होणार आहे, ह्या प्रश्नाचे उत्तर ना सोनोवाल यांच्याकडे होते ना संबंधित खात्याचे केंद्रीय सचिव यांच्याकडे. हे सारे काय दर्शविते ? आम्ही कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाही असे पंतप्रधानांसह मुख्यमंत्री,उप मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात वारंवार सांगितले. पण अणुऊर्जा प्रकल्पामुळे बाधित पोफरण- अक्करपट्टा प्रकल्पग्रस्तांना तुम्ही कसे वाऱ्यावर सोडले आहे, हे जरा आपलेच माजी राज्यपाल व ह्या भागाचे प्रतिनिधीत्व केलेल्या राम नाईक यांच्याकडून समजून घ्या,असे आमचे सांगणे आहे.

अणुऊर्जा प्रकल्पामुळे बाधित असल्याने तर हा प्रश्न थेट पंतप्रधान यांच्याशी संबंधित, पण पंतप्रधानानी ह्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नात लक्ष घातल्याचे दिसले नाही आणि तसे ते स्वारस्य मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनाही नाही. परिणामा राम नाईक यांना उच्च न्यायालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. वाढवण बंदराचे भूमिपूजन तुम्ही केले असले तरी हे व असे अनेक प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. भूमिपूजनाच्या दिवशी स्थानिकांच्या आक्रोशाने याचे गांभीर्य दाखवून दिले आहे. कदाचित ह्या आक्रोशाच्या भीतीनेच तुम्ही वाढवणला न जाता पालघर येथून भूमिपूजन केले असेल. परंतु स्थानिकांना असं किती काळ दूर ठेवणार आहात ?

लोकसंसद

## ७७ हजार कोटीची वाहने पडून ... गिऱ्हाईक नाही ... डीलर्स ची चिंता वाढली

सध्या डीलर्स कडे जवळपास ७७ हजार कोटीची वाहने पडून आहेत .याबद्दल फ डरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स या संस्थेने याबाबत चिंता व्यक्त केली आहे . ही बातमी नुकतीच वाचली . एका बातमीनुसार ऑगस्ट महिन्यात विक्रीविना पडून असलेल्या वाहनाचा साठा ७० दिवसा हुन अधिक झाला आहे . विशेष म्हणजे या पडून असलेल्या वाहनांची संख्या सुमफ्रे ७७८०० कोटी रुपयांची आहे अशीच परिस्थिति कायम राहिल्यास भविष्यात डीलर्स ना अनेक संकटाना तोंड द्यावे लागणार आहे . ग्राहकाकडून मागणी कमी आहे याशिवाय निसर्गाने सुद्धा अनेक अडचणी निर्माण केल्या आहेत . सतत पडणारा पाऊस हे एक कारण आहे . केवळ एका महिन्यात विक्रीतील घट ३. ४६ टक्के आहे . ऑगस्ट २३ मध्ये एकूण वाहने ३२३७२० एवढी वाहने विक्री झाली होती . ही संख्या ऑगस्ट २४ मध्ये ही संख्या ३०९०५३ एवढी झाली . वाहने पडून राहिल्यामुळे डीलर्स चा तोटा होण्याची शक्यता आहे . वाहनांचा साठा १० दिवसापेक्षा अधिक काळ पडून राहिला तर डीलर्स चा नफा दोन टक्क्यांनी कमी होता. एकूणच हे संकट लवकर दूर होवो अशी अपेक्षा करूया. आताच वाहन धंद्याला चांगले दिवस आले आहेत. त्यातच ही अडचण निर्माण झाली आहे.

**शांताराम वाघ पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**११ सप्टेंबर**

**१८६७:-** वेदांचे गाढे अभ्यासक (वेदवाचस्पती) श्रीपाद दामोदर सातवळेकर यांचा जन्म. मराठी, हिंदी व इंग्रजी मिळून तब्बल ४०० पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. 'वैदिक धर्म' हे हिंदी व 'पुरुषार्थ' हे मराठी मासिक त्यांनी काढले होते. 'संस्कृत स्वयंशिक्षक' या मालेत २४ पुस्तके, भारतीय संस्कृती' हा ५० लेखांचा संग्रह, एक हजार पृष्ठांची 'उपनिषद भाष्य ग्रंथमाला' असे लेखन त्यांनी केले. **१८७९: -** कवी, टीकाकार नरहर शंकर रहाळकर यांचा जन्म. ह्यांच्या स्फूट कविता तत्कालिन पत्रातून प्रसिध्द. 'पुष्पांजली' हा त्यांच्या स्फुट कवितांचा संग्रह प्रसिध्द. 'केशवसुत आणि त्यांच्या कविता' या लेखमालेसह 'वीरधर्मदर्पण' व 'उत्तर रामचरित्र' ही भाषांतरीत नाटके, 'शांकुतलसौंदर्य' हा टीकात्मक निबंध अशी साहित्य संपदा. केशवसुतांच्या कवितेचे एक मर्मज्ञ समीक्षक असा नावलौकिक त्यांनी संपादित केला होता.. **१८९२ :-** संतसाहित्याचे एक अभ्यासक लेखक यशवंत विठ्ठल परांजपे यांचा जन्म. 'योगवसिष्ठांचे मराठी संतकवींवर झालेले परिणाम' हा त्यांचा पी एच डी' चा प्रबंध. 'योगवसिष्ठ आणि संत वाङ्:मय' या नावाने पुस्तक रुपात प्रसिध्द झाला. **१८९५ :-** आचार्य विनोबा भावे (विनायक नरहर भावे) यांचा जन्म. 'गीताई' हे भगवद्गीताभाष्य व 'मधुकर' ही निबंधमाला, याखेरीज 'स्वराज्यशास्त्र', 'जीवनदृष्टी', 'क्रांतिदर्शन', 'दीक्षा', 'गुरुबोध', 'कुराणसार', 'भागवतसार आणि धम्म पद, तसेच 'भूदान गंगा' अशी ४० पुस्तके त्यांनी लिहिली होती. **१९०१: -** मराठी कवितेला आधुनिक रुपबंध देणारे कवी 'अनिल' तथा आत्माराम रावजी देशपांडे यांचा जन्म. 'दशपदी' या साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त संग्रहात दहा ओळीच्या कवितेचा तो नवा प्रकार होता, तर 'निर्वासित चिनी मुलास' हे दीर्घकाव्य, 'कोंबडा' सारखी कविता या नव्या जगाच्या नव्या प्रश्नांना भिडण्याची त्यांची ताकद दिसली. अर्थात, अनिल ओळखले गेले ते त्यांच्या संयत प्रेमकवितांसाठी ! **१९११: -** लेखिका, समाजसेविका अपर्णा सदाशिव देशपांडे यांचा जन्म. 'घरकुल नवे काव्यमय उखाणे', 'नवी मंगल गीते', 'निवारा', 'प्रभू तुझ्या चरणी' हे काव्यसंग्रह आणि 'गूळखोबरे', 'खिरापत' ही बालगीते अशी साहित्य संपदा प्रसिध्द. **१९१३:**विविध नियतकालिकांतून कथा, काव्य लिहिणारे वामन गणेश तळवलकर यांचा जन्म. 'प्राची' ह्या कथासंग्रहासह 'लयलुट' मधून त्यांनी काही लेखकांच्या अनुवादित कथा साकारल्यात. **१९१५: -** लेखक, 'बालशारदा' चे संपादक, ज्योतिषाचे अभ्यासक भालचंद्र लक्ष्मण रानडे यांचा जन्म. ह्यांचे 'जीवन साधना', निसर्गोपचार', 'शिवकवच' 'भावप्रभा', 'लुकतूक', 'कल्पफुले' हे काव्यसंग्रह, 'पंडिती काव्य' हा गद्यानुवाद अशी साहित्य ह्या अनुवादित साहित्यासह संपदा. **१९२१:** नाटयलेखिका इंदुमती वामन गोखले यांचा जन्म. यांनी १८५७च्या उठावाच्या पार्श्वभूमीवर 'तेजस्विनी' हे नाटक लिहिले होते. **१९२१ :** संगीत विषयक लेखक, हार्मोनियम व सतार वादक, पेशाने लायसोशिएट इन टेक्निकल केमिस्ट विथ स्पेशलायझेशन इन दी टेक्नॉलॉजी ऑफ फूडस अँड ड्रग्ज तसेच अनेक गायकांना मैफिलीत साथ देणारे अनंत विश्वनाथ बेडेकर यांचा जन्म. ह्यांचा हार्मोनियम या वाद्याचा इतिहास सांगणारा 'हार्मोनियम' हा ग्रंथ प्रकाशित. **१९२६ :-** इतिहास, मराठी आदी विषयांचे अभ्यासक आणि भारतीय इतिहास संकलन समितीचे आधारस्तंभ डॉ. चिंतामणि नारायण तथा बंडोपंत परचुरे यांचा जन्म. बंडोपंतानी इतिहासाचार्य राजवाडयांच्या वाङ्:मयीन सिध्दांताची समिक्षा या विषयावर पी एच डी केली. याशिवाय १०० पुस्तकांचे प्रकाशन आणि २० पुस्तकांचे संकलन केले. त्यात पहिल्या महिला डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी यांचा अप्रकाशित साधनाचे संकलन त्यांचे महत्त्वपूर्ण आहे. याशिवाय 'शिवछत्रपतींचे चलन','भारतीय इतिहास लेखनाचे प्रयत्न', 'परिपूर्ती अशी पुस्तके त्यांच्या नावावर आहेत.. **१९३१:-** मराठीचे अभ्यासक प्रा. माधव नारायण आचार्य यांचा जन्म. समीक्षालेखक म्हणून त्यांची कारकीर्द गाजली. 'सत्यकथा', 'आलोचना', 'अभिरुची', 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' ,'संग्रहालय','कवितारती', 'ललित', 'भाषा आणि जीवन', 'गीता दर्शन', 'धर्मभास्कर', 'बापरखुमादेवीवर' इत्यादी नियतकालिकांतून समीक्षणात्मक व्याकरण विषयक लेखन केले आहे. वरील नियतकालिकांतून आलेल्या काही निबंधाचा संग्रह 'अनुषंग' या नावाने स्वतंत्र प्रकाशित ग्रंथ आहे. ज्ञानदेवांपासून मोरोपंतापर्यंत प्राचीन कवींच्या काव्याने रसाळ समीक्षण करणारा त्यांचा 'ज्ञानमयुरांची कविता' हा ग्रंथ 'आर्याभारत नवदर्शन' या ग्रंथात महाभारताचा एक संक्षिप्त अनुवाद म्हणून आर्याभारताचा विचार त्यांनी स्पष्ट केला आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

११ सप्टेंबर

१) श्रीम. अनुराधा सुभाष चेंढरे अलिबाग दि.११-९-१९४७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

**कल्याणमधील एका तीस वर्षीय विवाहित महिलेवर घरात घुसून नातेवाईकांनीच सामुहिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. तसेच, वीट भट्टीवर काम करीत असलेल्या या विवाहित महिलेच्या तोंडाचा जबडा देखील मारहाणीत फाटला गेल्याचे बोलले जात आहे. तिला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तीन जणांना अत्याचाराबाबत अटक करण्यात आले आहे. पीडितेच्या लहान मुलांसमोरच आरोपींनी कृत्य केल्याने गाव पातळीवरील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.**



कल्याण तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीत एकंदरीत ६७ गावांचा समावेश असून अत्यल्प पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा भार सोसावा लागत आहे. यामुळे पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अनेक ठिकाणी पोलिसांना घटनास्थळापर्यंत पोहोचायला नेहमीच उशीर होत असल्यामुळे या ठिकाणी गुन्ह्यांचा वाढता आलेख पहायला मिळत आहे. यातच तीस वर्षीय विवाहित महिला टिटवाळा नजीक पती आणि दोन मुलांसह वीट भट्टीवर काम करीत आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करीत आहे. ६ सप्टेंबर रोजी पिडीतेचा पती बाहेर गेला असता रात्री दहापर्यंत

### ■ विवाहितेवर नातेवाईकांकडूनच अत्याचार

तो आला नसल्याने याच संधीचा फायदा उठवत पीडितेचा सासरा, दीर आणि एका अल्पवयीन नातेवाईकाने झोपडीत घुसून विवाहितेवर सामुहीक अत्याचार केला आहे. पीडीताने अत्याचाराच्या घटनेबाबत पतीला सांगितले असता तिला याबाबत पतीनेच बेदम मारहाण करीत घडलेल्या घटनेबाबत कुठेही वाच्यता करू नकोस असा दमदेखील भरल्याचे सांगण्यात येत आहे. या पिडित महिलेला गंभीर अवस्थेत रुग्णालयात उपचारार्थ शुक्रवारी दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

ही घटना शुक्रवारी (दि.६) घडली असताना याबाबत कल्याण तालुका पोलीस स्टेशनमध्ये रविवारी (दि.८) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रुग्णालयात उपचार सुरू असल्याने गुन्हा दाखल करण्यास विलंब झाला असल्याची माहिती यावेळी कल्याण पोलिसांकडून देण्यात आली आहे. तसेच, वरीष्ठ पोलीस निरिक्षक सुरेश कदम यांनी तपासाला गती देत तीनही आरोपींना अटक करण्यात आल्याचे सांगितले आहे.

### अल्पवयीन मुलीची छेड

**शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका २३ वर्षीय युवकाने शनिवारी (दि.७) त्याच परिसरात एका घरा समोर खेळत असलेल्या सहा वर्षाच्या मुलीचा हात धरला. यावेळी त्या मुलीने घाबरून आरडाओरडा करताच स्थानिक नागरिकांनी त्या युवकाला पकडून चांगलाच चोप दिला आहे. तसेच, तिला खेचून दुसरीकडे नेण्याचा या युवकाचा प्रयत्न असल्याचा देखील आरोप त्याच्यावर करण्यात आला आहे. यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्या विरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

### गतीमंद मुलीवर अत्याचार

**देशात मुलींवर लैंगिक आत्याचार करण्याच्या घटना ताज्या असतानाच मुंब्र्यातील एका अल्पवयीन गतीमंद मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. येथील कौसा भागातील देवरीपाडा परीसरात रहात असलेल्या एका १४ वर्षाच्या अल्पवयीन गतीमंद मुलीला खाऊचे अमिष दाखवून मुन्नवर खान (५०) याने लैंगिक अत्याचार केले असून मोहम्मद अबिद याने छेडछाड केली आहे. ही बाब उघडकीस येताच स्थानिक नागरिकांनी त्या दोघांना मारहाण केली आहे. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करून दोघांना अटक करण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त उत्तम कोलेकर यांनी दिली आहे.**

### बदलापुरात तरूणीवर अत्याचार

**बदलापुरातील अत्याचाराची घटना ताजी असतानाच पुन्हा २२ वर्षीय तरुणीवर अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. पिडीतेच्या मैत्रीणीच्या ओळखीच्या दोन तरुणांनी पिडीतेवर अत्याचार केल्याचे समोर आले आहे. यातील पिडीतेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर अत्याचार झाल्याचे प्रथम दर्शनी तपासात पुढे आले आहे. ३ सप्टेंबरच्या मध्यरात्री पिडीत तरुणी पनवेलमध्ये मैत्रिणीच्या वाढदिवसानिमित्त पार्टीसाठी गेली असताना हा प्रकार घडला आहे. या प्रकरणी आरोपी तरुणी आणि इतर दोन जणांना बदलापूर पूर्व पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**

## वृध्द महिलेला गंडा




**। पालघर । प्रतिनिधी ।**

बँकेतून निवृत्त झालेल्या एका वृध्द महिलेला सायबर चोरांनी तब्बल २८ लाखांचा गंडा घातला आहे. पीडीत महिला ७६ वर्षांच्या असून त्या मुंबईच्या वांद्रे येथील पाली हिल परिसरात रहातात. २३ जुलै रोजी त्यांना एक फोन आला. यात मी रिझर्व बँक ऑफ इंडियामधून बोलत असून तुमच्या नावाने घेतलेल्या क्रेडिट कार्डचा गैरवापर झाला असल्याचे त्याने सांगितले. तसेच, तुमच्यावर हैदराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे सांगण्यात आले. यानंतर पीडीत महिलेला हैद्राबाद पोलिसांच्या नावाने व्हिडिओ कॉल आला आणि फिर्यादी यांना 'डिजिटल अरेस्ट' करत असल्याचे सांगण्यात आले.

तसेच, यातून मार्ग काढण्यासाठी पैशांची मागणी केली. यावेळी पीडीत महिला या सायबर भामट्यांच्या जाळ्यात अडकल्या आणि चार वेळा वांद्रे येथील आपल्या बँकेत जाऊन एकूण २८ लाख रुपये या सायबर भामट्यांना पाठवले. यानंतर भामट्यांनी फिर्यादी महिलेचे शेअर सर्टिफिकेट ट्रान्सफर करण्यासाठी सांगितले असता या महिलेला संशय आल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी वसई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## वैतरणा नदीत इसम गेला वाहून

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्यातील मध्य वैतरणा धरणातून कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक मोठ्या प्रमाणावर विसर्ग करण्यात आल्याने बेसावधपणे पूल ओलांडून जात असलेले भास्कर नाथा पादीर (४०) वाहून गेल्याची घटना घडली आहे. तर, त्यांची मुलगी रुचिका (८) ही थोडक्यात बचावली आहे. ही दुर्घटना शनिवारी (दि.७) घडली आहे.

जिल्ह्यातील भास्कर पाधीर आणि त्यांची मुलगी रुचिका असे दोघे वैतरणा नदीवरील सावर्डे पुलावरून बेसावध जात असताना अचानक नदीचा प्रवाह वाढल्याने भास्कर यांनी आपल्या मुलीला खांद्यावर उचलून घेतले. परंतु, पाण्याचा जोर जास्त असल्याने त्यांना स्वतःला सांभाळता आले



नाही. यातच ते वाहून गेले. तसेच, अगदी शेवटच्या क्षणी काठावरील माणसांनी रुचिकाला हात देत सावरल्याने तीला सुखरूप बाहेर काढता आले आहे. मात्र, भास्कर यांचा शोध रात्री उशिरापर्यंत चालूच होता. परंतु, त्यांचा शोध लागला नाही.

अशा या घटनेंमुळे मध्य वैतरणा परिसर हा दुर्घटनांचे माहेरघर बनला आहे. परंतु, स्थानिक नेते मंडळी, बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन याबाबत उपाययोजना करत नसल्याने अशा दुर्घटना सातत्याने घडत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि.६) रात्री उशिरापर्यंत मध्य वैतरणा धरणांतून विसर्ग करण्यात आला नव्हता. मात्र, शनिवारी (दि.७) संध्याकाळच्या सुमारास धरणाच्या खाली असलेल्या गावांना कोणत्याही प्रकारची सूचना न देता अचानक मध्य वैतरणा धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात आला. तसेच, अजुनही काही लोक संध्याकाळी कामाहून शहापूर तालुक्यातून मोखाडा तालुक्यातील सावर्डे येथे गावी परतत असतात. मात्र, येथील धोकादायक पुलाच्या दुतर्फा बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने कोणतीही सुरक्षा व्यवस्था तैनात केलेली नाही. याबाबत येथील ग्रामस्थांनी आंदोलन करणार असल्याचे सांगितले आहे.

## मोकाट जनावरांमुळे कोंडी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

शहरातील काही मार्गांवर मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. अशातच शनिवारी (दि.७) अनेक भागात गणपती आगमनाच्या मिरवणुका निघाल्या होत्या. यावेळी मोकाट जनावरांनी मुख्य रस्त्यावर ठाण मांडल्याने काही भागात वाहतूक कोंडी झाली होती. याचा त्रास गणेशभक्तांना झाला. शहरातील साळवी स्टॉप, आरोग्य मंदिर, नाचणे, रेल्वे स्टेशन, आठवडा बाजार येथे मोकाट जनावरे रात्रीच्या वेळीही ठाण मांडून बसतात. यामुळे वाहनचालकांना कसरत करत वाहने चालवावी लागतात.

## अपुर्ण रस्त्यामुळे गाडीचा अपघात

**। पालघी । प्रतिनिधी ।**

काशिमीरा येथे गेल्या एका वर्षापासून एमएमआरडीएकडून सिमेंट काँक्रिट रस्त्याचे काम सुरू असून अद्याप हे काम पूर्ण झालेले नाही.

तसेच, सुरक्षेच्या दृष्टीने ठेकेदाराकडून कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली नाही. यामुळे वाहनांचे अपघात होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नीलकमल नाका येथे रविवारी (दि.८) सकाळी अकरा वाजताच्या सुमारास चारचाकी गाडी अपुर्ण सिमेंट रस्त्यावरून खाली गटारात जाऊन अपघात झाला आहे. यामध्ये कोणतीही जिवीतहानी झाली नसली तरी गाडीचे मोठ्या



प्रमाणात नुकसान झाले आहे. याकडे एमएमआरडीए अधिकारी आणि महापालिका अधिकारी दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच, नागरिकांना वाहतूक कोंडीचा देखील सामना करावा लागत आहे. या ठेकेदारावर कारवाई करून त्याला काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

## विशेष गाडीचे आरक्षण सुरु

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवामुळे कोकण रेल्वे मार्गावरील वाढलेली गर्दी लक्षात घेता रविवारी (दि.१५) मडगाव ते पनवेल मार्गावर विशेष गाडी सोडण्यात येणार आहे. एकूण २० एलएचबी डब्यांसह ही गाडी धावणार असून या विशेष गाडीसाठी आरक्षण मंगळवार (दि.१०) पासून सुरु झाले आहे.

गणपती विसर्जनानंतर वाढलेली गर्दी लक्षात घेऊन कोकण रेल्वेने मध्य रेल्वेच्या सहयोगाने गर्दीनुसार विशेष गाड्यांचे नियोजन करण्याचे धोरण स्वीकारले आहे. यानुसार मडगाव ते पनवेल मार्गावर १५ सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजता विशेष गाडी (०१४२८)



सुटेल. पनवेलला ती रात्री सव्वादहा वाजत पोहोचेल. परतीच्या प्रवासात ही गाडी (०१४२७) पनवेल येथून रात्री पावणेबारा वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता मडगावला पोहोचणार आहे.

## विनयभंग करणारा अटकेत

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

कल्याण पूर्वेतील मलंग रस्त्यावर एका गृह संकुलात आपल्या आई वडिलांबरोबर राहणाऱ्या आठ वर्षाच्या बालिकेचा एका ४८ वर्षाच्या व्यक्तीने गेल्या महिन्यात विनयभंग केला होता. पीडित मुलीच्या आई-वडिलांनी या संदर्भात कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली. तक्रार दाखल होताच पोलिसांनी तरुणाला मुंबईतील कांदिवली येथून अटक केली आहे. रमेश मुरलीधर यादव असे आरोपीचे नाव आहे. तो व्यवसाय निमित्त मुंबईतील कांदिवली येथे राहत असून मूळचा उत्तर प्रदेशातील जोनपुर जिल्ह्यातील रहिवासी आहे. तसेच, तो पीडित मुलीच्या घरी पाहुणा म्हणून राहण्यास आला होता. वपानि अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## बोगस डॉक्टरवर कारवाई

**। पालघर । प्रतिनिधी ।**

वसई-विरार शहरात नुकतीच पालिकेच्या वैद्यकीय विभागाने वसई पूर्वेच्या भोयदापाडा येथील बेकायदेशीरपणे दवाखाना चालविणाऱ्या बोगस डॉक्टरवर कारवाई केली आहे. यावेळी डॉक्टर नसताना कर्मचाऱ्याकडून रुग्णांवर उपचार केले जात असल्याचे उघड झाले आहे.

सातीवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय आरोग्य पथक तपासणीसाठी फिरत असताना भोयदापाडा राजावळी रस्त्यावर बालाजी क्लिनिक या नावाने कोणतीही परवानगी न



घेता बोगस डॉक्टरद्वारे दवाखाना चालविला जात असल्याची माहिती मिळाली होती. शुक्रवारी दुपारी डॉ. श्रीनिवासराव धुधमल आणि पथक यांनी पोलिसांना सोबत घेऊन याठीकाणी धाड टाकली. यावेळी डॉक्टर नसतानाही कामासाठी ठेवलेल्या कर्मचाऱ्यांकडून रुग्णाला इंजेक्शन देऊन उपचार केले जात असल्याचे उघड झाले आहे. रामचंद्र रामदूर यादव असे या कर्मचाऱ्याचे नाव असून कोणतीही वैद्यकीय डिग्री नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

या दवाखान्याला डॉ. अरविंद कुमार यादव यांचा फलक लावून त्या ठिकाणी कर्मचारी रुग्णांना सेवा देत होता, अशी माहिती पालिकेच्या वैद्यकीय विभागाने दिली आहे. तसेच, दवाखान्यात इन्जेक्शन्स, आय.व्हि.सेट व इतर ॲलोपॅथी औषधे आढळून आली असून याप्रकरणी रामचंद्र यादव याच्या विरोधात वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रिक्षा चालकाचे गैरवर्तन

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

कल्याण पूर्व भागात राहत असलेली एक अल्पवयीन विद्यार्थिनी दररोज सकाळी खासगी शिकवणीला जात असे. घरी येताना शिकवणी वर्गा बाहेर मिळणाऱ्या रिक्षातून घरी येत असे. सोमवारी (दि.९) ही विद्यार्थिनी घरी येण्यासाठी एका रिक्षात बसली आणि रिक्षा सुरू झाल्यानंतर काही वेळाने रिक्षा चालक गोपाळ मुदलियारने विद्यार्थिनीकडे तिचा मोबाईल क्रमांक मागू लागला. मुलीने त्याला मोबाईल क्रमांक देण्यास नकार दिला. यानंतर रिक्षा चालकाने मुलीची छेड काढण्यास सुरूवात केली. रिक्षा चालक आपल्याशी गैरवर्तन करत आहे याची जाणीव झाल्यावर विद्यार्थिनीने धावत्या रिक्षातून बाहेर उडी मारून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. रिक्षाचालकाने तिचा पाठलाग करून तिला शिवागाळ केली. याबाबत कोळसेवाडी पोलीस ठाण्यात रिक्षा चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तातडीने गोपाळ मुदलियार याला अटक केली आहे.

## गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक

**। पालघर । प्रतिनिधी ।**

एकापाठोपाठ एक आर्थिक घोटाळे समोर येत असतानाच आता बोईसरच्या दिपांकर इन्वेस्टमेंट नावाच्या कंपनीने गुंतवणूकदारांचे पैसे बुडविल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. जास्त व्याज आणि दुप्पट परतावा देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या 'दीपाकर फिनकॅप इन्व्हेसमेंट' विरोधात बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कंपनीचे बोईसर येथे




कार्यालय असून कंपनीने नागरिकांना त्यांनी गुंतवलेल्या रकमेवर मासिक दहा ते बारा टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवत शेकडो कोटी रुपये जमा केले होते. सुरुवातीला एक ते दोन महिने गुंतवणूकदारांना आकर्षक परतावा देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. तसेच, कंपनीने नेमलेल्या विक्री प्रतिनिधींच्या मदतीने हजारो ग्राहकांकडून शेकडो कोटींची गुंतवणूक या कंपनीत करण्यात आली होती. मात्र, कालांतराने कंपनीकडून कराराप्रमाणे परतावा देण्यास चालढकल सुरू झाल्याने गुंतवणूकदारांमध्ये खळबळ माजली असून त्यांनी जमा केलेली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. यावेळी कंपनीने जमा केलेली मूळ रक्कम देण्यास असमर्थता दर्शविल्याने बोईसर पोलीस ठाणे आणि आर्थिक गुन्हे शाखा यांच्याकडे अनेक गुंतवणूकदारांकडून तक्रारी करण्यात आल्या आहेत.

## वाहतूक कोंडीवर उपाययोजना



**। पालघर । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव काळात नागरिकांची वाढती रेलचेल पाहता बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या उद्भवण्याची शक्यता असून सफाळे पोलिसांनी यावर तोडगा काढला आहे. रेल्वे फाटक ते इब्राहिम मंजिल भागात ७ सप्टेंबरपासून 'नो पार्किंग झोन' घोषित करण्यात आले असून या नियमाचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाई केली जाणार आहे.

पालघर तालुक्यातील सफाळेतील पूर्व, पश्चिम भागातील सुमारे ५० ते ५५ गावापाड्यातील नागरिकांना दैनंदिन आणि सणउत्सवाच्या खरेदीसाठी सफाळे बाजारपेठेचा एकमेव पर्याय आहे. सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम असल्याने नागरिक मोठ्या संख्येने खरेदीसाठी येत आहेत. अशातच दैनंदिन वाहनचालकांमुळे सफाळे रेल्वे फाटकापासून ते थेट स्टेट बँक परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. त्यामुळे खरेदीसाठी बाजारपेठेत आलेल्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा मोठा त्रास होतो. यासंदर्भात सफाळे पोलिसांनी यापूर्वीच सम व विषम पद्धतीने पार्किंगची व्यवस्था केली आहे. मात्र, सणउत्सवाच्या वेळी पार्किंग केलेल्या वाहनांमुळे तसेच रेल्वे फाटक बंद असल्यावर वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना चालणे जिकारीचे होते. सोबतच वाहतूक पोलिसांवर देखील त्याचा ताण वाढत आहे. याकरिता सफाळे पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता शेळके यांनी वाहतूक कोंडीचा त्रास दूर करण्यासाठी ७ सप्टेंबरपासून सफाळे बाजारपेठेत नो पार्किंग झोनची उपाययोजना जाहीर केली आहे.

**ऐन गणेशोत्सवात दारूबंदीचा निर्णय**

# लांजातील ग्रामपंचायतीचा आदर्शवत ठराव

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**लांजा तालुक्यात सहा ठिकाणी पोलिसांनी धाडी टाकून विनापरवाना सुरू असलेले दारू धंदे उघडकीस आणले होते. मात्र, पोलिसांच्या भूमिकेवरच अवलंबून न राहता नागरिक म्हणून आपल्या जबाबदारीची जाणीव करून लांजा तालुक्यातील ग्रामपंचायतीने दारूबंदीचा निर्णय घेतला आहे. ऐन गणेशोत्सवात दारूबंदीचा घेतलेला हा निर्णय सर्वांसाठी आदर्शवत ठरला आहे.**



या निर्णयानुसार गावात कोणाकडे दारू आढळून आल्यास त्यावर कडक कारवाई करण्याचा ठराव ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आला आहे. लांजा तालुक्यातील अन्य ग्रामपंचायतींना आदर्शवत ठरेल असे काम वाघ्रट-वाडीलिंबू ग्रुप ग्रामपंचायतीकडून करण्यात आले आहे. तसेच, लांजा तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती या महात्मा गांधी तंटामुक्ती पुरस्काराने सन्मानित आहेत. सन्मानित होऊनही काही ग्रामपंचायत हद्दीत विनापरवाना दारुधंदे सुरू असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून दाखल करण्यात आल्या होत्या. या विरोधात दारुबंदीबाबत पोलिसी कारवाईवरच विसंबून न राहताना नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घ्यायला हवा. याला अपवाद बाघ्रट-वाडीलिंबू ग्रुप ग्रामपंचायत ठरली आहे.

दारूबंदीचा निर्णय घेणाऱ्या बापट वाढीलिंबू ग्रुप ग्रामपंचायतीची दखल तालुका तसेच जिल्हा प्रशासनाने घेतली आहे. याबाबतचा ठराव दि. ३० ऑगस्ट रोजी ग्रामपंचायतिने मंजूर केला होता. तत्पूर्वी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये वाडीलिंबू आणि वाघ्रट गावामध्ये बिअरशॉपी चालवण्यासाठी परवानगी अर्ज करण्यात आले होते. मात्र, या मागणीला ग्रामपंचायतीकडून कडाडून तीव्र विरोध करण्यात आला होता. यानंतर दोनीही गावातील सुशिक्षित तरुण युवक, ग्रामस्थ व महिलांनी एकत्र येत दारूबंदी करण्याचा विचार ग्रामपंचायतीसमोर मांडला होता. तात्काळ नागरिकांची एकजूट आणि विचारणेला प्रेरित होऊन ग्रामपंचायतीने या निर्णयाचे स्वागतच केले.

### ग्रामपंचायतीच्या निर्णयाचे कौतुक

**लांजा तालुक्यात दारू बंदी विरोधात पोलिसांचे पाऊल कौतुकास्पद असले तरी तालुक्यात अवैध दारू धंदे पूर्णतः बंद व्हायला हवेत, अशी मागणी जनतेतून होऊ लागली आहे. वाघ्रट–वाडीलिंबू ग्रुप ग्रामपंचायतीच्यावतीने गावांमध्ये पूर्णतः दारूबंदीवर ठराव एकजुटीने केला आहे. यामुळे या ग्रामपंचायतीचे तालुक्यातून कौतुक केले जात आहे.**

**निवडक**

## डिझेल चोर गजाआड

**पनवेल :** टायरसह डिझेल चोरी करणाऱ्या दुकलीला पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले असून यातील एक गुन्हेगार सराईत असल्याने त्याच्याकडून विविध प्रकारचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. पनवेल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ओवळे गाव परिसरात एका वाहनाच्या टायरची चोरी झाली होती. या प्रकरणी शेरसिंह राठोड व आमिन सय्यद यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गाडीचे टायर रिंगसह चोरल्याचे कबूल केले.

## दारुच्या वादातून वार

**पनवेल :** दारु पिण्याच्या वादातून एका तरुणाच्या गळ्यावर धारदार वस्तूने वार करून त्याला जखमी केल्याची घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. संदेश बिडला हा शिवनगर देवद येथे राहत असून तो मद्य प्राशन करण्यासाठी मित्रांसोबत गेला होता. त्यांच्यात दारु पिवून झालेल्या वादातून एका मित्राने धारदार वस्तूने त्याच्या गळ्यावर, हातावर व गालावर वार करून तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अपघातामध्ये तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** दुचाकीला अनोळखी वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात जिजा शर्मा याचा मृत्यू झाला. या प्रकरणी वाहन चालकाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.जिजा शर्मा हा मोटरसायकलवरून जात होता. शिळफाटा पनवेल हायवे रोडवर मंदिराजवळ ब्रिज सुरू होण्याच्या ५० मीटर अगोदर कळंबोली येथे आला असता अज्ञात वाहनाची ठोकर लागून अपघात झाला व त्याचा मृत्यू झाला. वाहनचालक वैद्यकीय मदत न करता पळून गेला.

## मोबाईल अज्ञातांनी चोरला

**पनवेल :** रेल्वेमध्ये मोबाईल फोन चार्जिंगला लावून झोपून प्रवास करणाऱ्या व्यक्तीचा मोबाईल चोरल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.अब्दुल मलिका यांनी भटकल रेल्वे स्टेशन येथून मुंबई सीएसएमटी एक्सप्रेस मध्ये झोपून प्रवास सुरू केला. मोबाईल फोन चार्जिंगला लावून ते रेल्वेत सीटवर झोपी गेले. दोन ते अडीच तासांनी झोपेतून जाग आल्यावर चार्जिंगला लावलेला मोबाईल पाहिला असता तो मिळून आला नाही.

## एटीएममधून रोकड लंपास

**पनवेल :** अनोळखी इसमाने काळ्या रंगाची पट्टी एटीएम मशिनमध्ये टाकून जवळपास ३७ हजार रुपये रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना पनवेल शहरात घडली. शहरातील अभ्युदय बँकेच्या इमारतीच्या एटीएम मशिनमध्ये एका अनोळखी इसमाने काळ्या रंगाची पट्टी टाकून ३ एटीएम धारकांचे १५ हजार, २० हजार व २ हजार असे मिळून जवळपास ३७ हजाराच्या रोख रक्कमेची चोरी केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# शासकीय विश्रामगृहाची दुरवस्था

## ५ वर्षानंतर ६० लाखाचा आला निधी; निधी कमतरतेने विश्रामगृह राहणार अपूर्ण

**। मुरूड जंजिरा। वार्ताहर ।**

मुरूड शहराचा परिसर निसर्गरम्य असल्याने जगातून पर्यटक मुरुडला भेट देतात. नवाब काळापासून मुरूड शहराची रचना सुंदर आहे. सार्वजनिक बांधकाम, वनविभाग व जिल्हा परिषद असे तीन विश्रामगृह येथे आहेत. विश्रामगृह समुद्रकिनारी असल्याने इमारतीच्या पायरीला समुद्राचे पाणी स्पर्श करते म्हणूनच पर्यटक शासकीय अधीकारी व परदेशी पाहुणे या विश्रामगृहात राहायला मिळेल अशी वाट पाहतात. परंतु कोविड काळात विश्रामगृह आरोग्य विभागाला वर्ग केल्याने ५ वर्षात विश्रामगृहाची कोणतीही दुरुस्ती झाली नसल्याने आज अतिशय वाईट परिस्थिती झाली आहे.



प्रवेशद्वारावर काटेरी झाडांचे जंगल तयार झाले आहे. भिंतींवर झाडे उगवली आहेत. ४ वर्षापूर्वीच नूतनीकरण करून २ वातानूकुलित कक्ष व ३ साधे कक्ष बनवण्यात आले होते. त्यानंतर मुरूडला झालेल्या वादळात पत्रे उडून गेल्याने नवीन कामाचे मोठे नुकसान झाले.

नुकतेच आरोग्य विभागाने त्यांचे साहित्य नेल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग केले आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने विश्रामगृह नूतनीकरणासाठी २०२० ला ८० लाखाचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यलयाला पाठवल्याची माहिती अभियंता माने यांनी दिली होती. ५ वर्षानंतर फक्त ६० लक्ष रूपयांचा निधी आल्याने इमारत दुरुस्तीचे काम सुरु झाले आहे.

> सार्वजनिक बांधकाम खात्याचा ६० लाख निधी आल्याने दुरुस्तीचे काम सुरु आहे. ६ महिन्यात काम पूर्ण करण्याची मुदत आहे. आतील कामाचा नवीन प्रस्ताव देणार आहे.
>
> – उमाजी राठोड, सार्वजनिक बांधकाम खाते अधिकारी

आतील फर्निचरसाठी पुन्हा निधी मागवणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम अधिकारी उमाजी राठोड यांनी दिली.

मुरूडसारख्या पर्यटन क्षेत्रात शासनाचे विश्रामगृह नूतनीकरणासाठी रायगडच्या पालकमंत्र्यांनी विशेष निधी देऊन नूतनीकरणाचे काम तातडीने सूर करावे अशी मागणी मरूडकरांकडून होत आहे. ८० लाखाच्या प्रस्तावात परिसराची झाडी कापून स्वछता, इमारतीत भिजलेले फर्निचर बदलणे. वातानुकूलित कक्ष पीओपी करून अंतर्गत सुशोभीकरण करणे हि कामे होणार आहेत.

### विश्रामगृहाच्या दुरवस्थेची कारणे

१ ) २020 साली आलेले तुफानी वादळ वादळात पत्रे उडाल्याने नवीनच केलेलं फर्निचर भिजले व खराब झाले.

२) पत्रे टाकून इमारत दुरुस्त केली. तोच कोरोना सुरु झाल्याने पुन्हा कोविड कारणांसाठी इमारत तहसीदारांनी आरोग्यविभागाकडे दिले

३) कोरोना काळात १५ दिवस काही पेशन्ट राहिले असतील नंतर इमारत पूर्ण रिकमीच राहिली कोव्हीडमुळे इमारतीत प्रवेश नसल्याने इमारतीची दुर्दशा झाली

४) कोव्हीड संपला पण अधिकारांच्या निरुत्सामुळे इमारतीती कोव्हीड रुग्णाचे साहित्य हटवण्यात २ वर्ष गेली त्यात इमारतीचे मोठे नुकसान झाले. आज इमारतीत प्रवेश करणे कठीण आहे. कक्ष वर्षभरत उधडलाच नाही.आत काय झाले असले देव जाणे .

# रायगड जिल्ह्यात गौरींचे आगमन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गणरायानंतर आता गौरींच्या आगमनाची लगबग जिल्ह्यात सुरू झाली. मंगळवारी जिल्ह्यात १५ हजार ८५३ ठिकाणी गौरींची प्रतिष्ठापना करण्यात आली. गौराईच्या स्वागतासाठी व सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्य, वस्तूंची खरेदी करण्यासाठी सोमवारी सायंकाळी जिल्ह्यातील बाजारपेठा फुलून गेल्या.


गौरीचा सण हा विशेषतः महिलांचा सण म्हणून ओळखला जातो. दिड दिवसांच्या बाप्पाच्या विसर्जनानंतर मंगळवारी जिल्ह्यात घरोघरी गौराईचे आगमन होणार आहे. गौराईच्या स्वागतासाठी लागणारे गौरीचे आकर्षक मुखवटे, तेरड्याची पाने, फेटे, कपडे, दागीने, पुजनाचे साहित्य अशा अनेक वस्तू जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये उपलब्ध झाल्या आहेत. अलिबागसह जिल्ह्यातील अनेक बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी महिलांची गर्दी दिसून आली. जिल्ह्यात काही ठिकाणी मुर्तींचे तर काही ठिकाणी मुखवट्यांचे पूजन केले जाणार आहे.

# पर्यटकांना निसर्गराजा गणपतीचे आकर्षण

## ट्रेकर्सना मेजवानी,कड्यावरचा गणपती म्हणून प्रसिद्ध

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानच्या डोंगरात एका दगडावर स्थानिक कलाकारांनी आपल्या कलाकुसरीने निर्माण केलेला निसर्गराजा गणपती आकर्षण ठरत आहे. डोंगराच्या कपारीत आणि खोल दरीच्या बाजूला ३५ फूट उंचीचा गणपती प्रामुख्याने ट्रेकर्सला आपल्याकडे खुणावतो. २००५ पासून निसर्गराजा गणपती उभारण्याचे काम केले जात असून त्यात अनेक बदल करून आज भव्य दिव्य निसर्गराजा गणपती उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे.



नेरळ -माथेरान मिनी ट्रेनच्या इंजिनाचे सारथ्य म्हणून अनेक वर्षे धुरा वाहणारे नेरळ येथील राजाराम खडे यांना माथेरानवरून नेरळकडे येताना एक कडा नेहमी खुणावत असे. साधारण ४७-५० फूट उंचीच्या या कड्याला असलेला आकारामुळे त्यांचे हात आपोआप जोडले जात. त्यांनी २००५ मध्ये माथेरानच्या डोंगरात ज्यावेळी प्रचंड भूस्खलन झाल. त्यावेळी मिनीट्रेन बंद पडली होती. त्यामुळे सतत आपल्याकडे आकर्षित करणाऱ्या त्या दगडाच्या कड्यावर खडे पोहचले. तेथे काळ्या पाषाणातील त्या दगडाला लोखंडी पत्र्याच्या सहाय्याने गणपतीच्या तोंडाचा आकार देण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर त्यांनी खडी आणि सिमेंट यांच्या सहाय्याने हात तयार केले. त्या चार हातात गणपती बाप्पाची चार आयुधे देण्यात आली. त्यामुळे बाप्पाचा आकार आल्याचे लक्षात येताच राजाराम खडे यांनी आपले सहकारी विश्वनाथ भोसले आणि राजीव शिंदे यांच्या मदतीने गवंडी काम करून निसर्ग राजा गणपती म्हणजे कड्यावरचा गणपती घडविला.

कड्यावरच्या गणपतीला रंगरंगोटी करण्यासाठी देखील अडचण निर्माण होऊ नये म्हणून लोखंडी शिड्या बनविण्यात आला आहेत. नेरळ ममदापुर येथील बाळू कारले यांनी त्या परिसराला आणि कितीही दूरवरून पाहिले तरी आकर्षक दिसेल असे रंगकाम पूर्ण करून केले आहे.त्यामुळे मिनीट्रेनमधून प्रवास करणारा प्रत्येक पर्यटक त्या गणपतीकडे पाहून दगडात कोरलेल्या गणेशाच्या मूर्तीचे कौतुक करीत असतात.

# अलिबागच्या मुलांचा राष्ट्रात डंका



**। अलिबाग । वार्ताहर ।**

नुकत्याच पंजाब येथे झालेल्या गतका फेडरेशन ऑफ इंडिया या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघातून रायगड जिल्ह्यातील अलिबागच्या मुलांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यात २ सुवर्ण, २ रौप्य व ३ कांस्य अशी एकूण ७ पदकं जिंकली आहेत.

अलिबाग तालुक्यातील रामनाथ येथील काजल पाटील व महाजने येथील श्रमिका पाटील या दोघी सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या आहेत. तर, पेढांबे येथील जिज्ञासा पाटील हिने रौप्य आणि कांस्यपदक प्राप्त केल आहे. जिज्ञासा ही दुहेरी पदक मिळवणारी पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. तसेच, नाना पाटील हायस्कूल पेझारी शाळेची विद्यार्थीनी तन्मयी पाटील हिने अंतिम सामन्यात अतिशय चांगला खेळ करत रौप्य पदक प्राप्त केले आहे. तर, सारळ येथील मानसी पाटील हिने हरियाणाला पराभूत करत कांस्यपदक प्राप्त केले आहे. तसेच, अलिबाग कोळीवाड्यातील प्रणाली कांबळे ही देखील कांस्यपदकाची मानकरी ठरली आहे.

यावेळी नवगाव येथील वेदिका कवळे आणि पंथ नगर येथील सोनू कामी यांनी अंतिम आठपर्यंत मजल मारली. या सर्व खेळाडूंची उत्तराखंड येथे होणाऱ्या खेलो इंडिया स्पर्धेसाठी सिलेक्शन ट्रायलसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच, अपूर्वा कोठारे, काव्या शेळके, श्रेयश चटियाल, खोपोलीतील आरुषी चौधरी, मालविका सुदेवान, स्वरा देशमुख, हर्षित गौड, अलिबाग मधील रोहन गुरव, तनया मंचेकर, सेजल पाटील यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले आहे.

## क्लासिक कॅटेगरीत जिंकला मानाचा किताब

# ममता संजीव कुमार ठरल्या मिसेस रायगड

**। पनवेल । वार्ताहर ।**

**ममता संजीव कुमार यांनी मिसेस रायगड-२०२४ चा मानाचा किताब क्लासिक कॅटेगरीत जिंकला. हा भव्य सोहळा डी.एस. एंटरटेनमेंटने आयोजित करण्यात आला होता. ममता यांच्या विजयानंतर, हिना मुकादम यांना प्रीमियम प्लस क्लासिक कॅटेगरीत विजेतेपद मिळाले, तर रिया मालुसरे यांनी प्रीमियम कॅटेगरीत बाजी मारली.**

ही स्पर्धा १ सप्टेंबर रोजी रायगड जिल्ह्यात पार पडली, ज्यामध्ये ५७ स्पर्धकांनी भाग घेतला होता. अंतिम फेरी खारघरच्या लिट्ल वर्ल्ड मॉलमध्ये रंगली.



क्लासिक कॅटेगरीत विजेतेपद मिळवलेल्या ममता यांनी आपल्या प्रवासाविषयी भावना व्यक्त केल्या. महिला म्हणून करिअर आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळणे खूप आव्हानात्मक असते, पण हेच आव्हान खूप समाधानकारक देखील ठरते. कुटुंब, काम आणि वैयक्तिक आवड यांचा समतोल साधताना अनेकदा ताण येतो, पण हे आव्हानच आपल्याला वाढण्याची संधी देते, असे ममता यांनी आपल्या विजयानंतर सांगितले.

ही स्पर्धा महिलांना त्यांची कौशल्ये, आवड आणि समर्पण दाखवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण मंच पुरवते. विवाह किंवा वैयक्तिक जबाबदाऱ्या यामुळे महिलांची प्रगती अडत नाही, हे या स्पर्धेने दाखवून दिले. हिना आणि रिया यांनीही आपली मेहनत, धैर्य आणि आत्मविश्वास यांचा ठसा उमटवत या स्पर्धेत विजयी झाले.

या स्पर्धेत तीन प्रमुख फेऱ्या होत्या: परिचय वॉक, जिथे स्पर्धकांनी आत्मविश्वासाने आपली ओळख करून दिली; टॅलेंट शो, ज्यामध्ये त्यांनी आपली कला आणि सर्जनशीलता सादर केली; आणि प्रश्नोत्तरे फेरी, ज्यात त्यांच्या बुद्धिमत्ता आणि तात्काळ विचारशक्तीची परीक्षा घेण्यात आली. या स्पर्धेत महिलांच्या सक्षमीकरणाचे जाहीर कौतुक करण्यात आले, ज्यामध्ये महिलांनी आपल्या विविध भूमिका सांभाळत कसे पुढे जाता येते हे दाखवून दिले.

ममता, हिना आणि रिया यांच्या विजयाने सर्व महिलांना एक शक्तिशाली संदेश दिला आहे की, सातत्यपूर्ण परिश्रम, आवड आणि स्वतःवरील विश्वास हे यशाचे गमक आहे. हा विजय हे दाखवतो की,महिलांनी जबाबदाऱ्या सांभाळूनही मोठ्या यशाची शिखरे गाठता येतात आणि त्यांचे जीवनात योगदान मोठे आहे.

# सोमवारी नेहुलीत कुस्ती स्पर्धा

## शेकाप नेते जयंत पाटील, पंडित पाटील यांची उपस्थिती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील श्री बहिरेश्वर मित्र मंडळ व शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत तसेच इंडिया आघाडीच्या सहकार्याने कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शेकाप सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांच्या हस्ते तसेच माजी आ. पंडित पाटील यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.१६) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास या स्पर्धेचा शुभारंभ होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य संजय पाटील, अलिबाग पंचायत समितीचे माजी उपसभापती सुरेश पाटील, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे युवा सेना रायगड जिल्हा प्रमुख पिंट्या ठाकूर, खंडाळेचे सरपंच नासिकेत कावजी, माजी उपसरपंच विनोद पाटील, माजी सदस्य नरेश गोंधळी, माजी तंटामुक्त अध्यक्ष संतोष गुरव, अलिबाग तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष विलास वालेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा संघटक ऋषीकांत भगत, खंडाळेचे सदस्य रुपेश पाटील, उद्योजक अर्जून चिमणे आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती आयजकांनी दिली.

गेल्या अनेक वर्षापासून श्री बहिरेश्वर मित्र मंडळाच्या वतीने कुस्ती स्पर्धा भरविली जात आहे. गावे, वाड्यांमधील कुस्ती मल्लांना या स्पर्धेच्या माध्यमातून हक्काचे व्यासपिठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- Office staff required for Office in Alibag Fresh graduates can come for interview Call 9923750549 Between 11 am to 6 pm
- अलिबाग एस.टी.स्टॅन्ड समोर 'अलिबाग प्राईड' येथे पहिला माळा, 'रोड फेसिंग' सेमी कमर्शिअल फ्लॅट भाडेतत्वावर देणे/विकणे आहे. Area1000 sq.ft (2BHK Flat) Contact : 9579548535 ( स.९ ते सं.६)
- दुकान भाड्याने मिळेल बेवुड, गोंधळपाडा अलिबाग ९४२३३७५१९८/८४११०१६४४४
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफ (वेटर/ हाऊसकिपींग)ची आवश्यकता आहे. एक ते दोन वर्ष अनुभव असणाऱ्यांनी रोहन ठाकूर यांना ९९२१०७४०४२ या नंबरवर संपर्क साधावा.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



## नवा पूल वाहतुकीसाठी खुला

**पनवेल :** खारघर वसाहतीमध्ये प्रवेश करण्यासाठी दुसरे प्रवेशद्वार गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर वाहनांसाठी खुले करण्यात आले. यासाठी सिडको मंडळाने सुमारे एक कोटी रुपये खर्च केला असून, यामुळे शीव-पनवेल महामार्गावरुन थेट कोपरा पुलावरून खारघर वसाहतीमध्ये वाहनांना शिरता येईल. यापूर्वीचा या ठिकाणचा पूल हा हलक्या वाहनांसाठी होता. येथे नवीन रुंद पूल बांधण्याची मागणी वाहनाचालकांकडून केली जात होती. खारघर येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यावेळी तात्पुरत्या स्वरुपात हा पूल कोपरा गावाजवळ बांधला होता. या पुलावरून अवजड वाहतूक टाळण्यासाठी हाईटगेट लावणार आहे. यामुळे या मार्गावरील प्रवास विनाअडथळा वेगाने होणार आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे- चरई बुद्रुक, ता. तळा, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक लक्ष्मण देवजी काप व इतर यांचेकडुन सदर मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे- चरई बुद्रुक, ता. तळा, जि.रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार |
|---|---|---|---|
| ८२ | ६ | ०-४१-००<br>पो.ख.०-००-००<br>एकुण ०-४१-०० | ०.२० |

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मुत्युपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क-हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकतीमध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात या प्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल, सही/-
तारीखः / / २०२४

**प्रसाद वामन कोंडे देशमुख**
**ॲडव्होकेट, पनवेल**

---

जा.क्र. ४२३९/२४
सार्वजनी न्यास नोंदणी कार्यालय,
मुख्यालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई. दि.२९.८.२०२४

**मे. धर्मादाय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. २ रा मजला, सास्मिरा इमारत, सस्मिरा रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०**

अर्ज क्र. - ६०/२०२४, कलम - ४७

**संस्थेचे नाव -**श्री संत गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, एफ - ७६३/रायगड. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४७ अन्वेय.

श्री सहदेव विठोबा सकपाळ व
श्री रमेश विठोबा सकपाळ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी श्री सहदेव विठोबा सकपाळ व श्री रमेश विठोबा सकपाळ यांनी श्री संत गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, एफ- ७६३/रायगड या न्यासास सध्या कोणीही विश्वस्त नसल्याने नवीन विश्वस्त नेमण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०चे कलम ४७ अन्वेय अर्ज सादर केला आहे.

तरी या नोटीसीद्वारे संबंधिताना कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही सांगावयाचे असल्यास अथवा हरकत घ्यावयाची असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत वरील पत्त्यावर आपले लेखी म्हणणे दाखल करावे. जर एखादी व्यक्ती स्वतः विश्वस्थ होण्यास इच्छुक असल्यास धर्मादाय आयुक्त कार्यालयाने मंजूर केलेले १४८ च्या परिपत्रकाप्रमाणे संमतीपत्र अर्जास जोडून वर नमूद केलेल्या कालावधीत अर्ज कार्यालयात सादर करावा. अन्यथा याबाबत कोणाचे काहीही म्हणणे अथवा हरकत नाही, असे समजून प्रकरणात योग्य ते आदेश दिले जातील, याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस हि मा.धर्मादाय सह आयुक्त २, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आदेशान्वये माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी आज दि. २९.८.२०२४ रोजी दिली आहे.

टीप - परिपत्रक क्र. १४८ हे या कार्यालयाचे संकेत स्थळ charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
**(सी.य.केणी)**
**अधिक्षक (न्याय)**
**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई यांचे कार्यालय**

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

## १ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

CIDCO
WE MAKE CITIES

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.

# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

## NOTIFICATION

### [UNDER SECTION 68(2) OF THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966]

### Town Planning Scheme No. 11 (TPS-11)

No. CIDCO/NAINA/TPS-11/ Draft Scheme/2024/**115**, Dt. 18th July 2024

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/UD-12, dated 10th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27th April, 2017 has sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, under Section 31(1) of the said Act, and vide Notification No. TPS. 1215/245/C.R. 332/16/EP/UD-12, dated 1st March, 2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1717/MIS-2750/C.R.91/2019/UD-12, dated 16th September, 2019 has sanctioned the Development Plan (DP) for 151 villages of NAINA and also vide Notification no. TPS. 1221/1041/C.R.71/21/UD-12, dated 24th June, 2022 and Notification No. TPS-1221/1041/C.R.71/21/EP-29/UD-12, dated 26th July, 2023 has partly sanctioned the Excluded Parts of the DP under section 31(1) of the said Act;

And whereas, as per Section 60(1) of the said Act, CIDCO's Board vide Resolution No. 12551, dated 2nd April, 2022 had delegated Managing Director, CIDCO (hereinafter will be referred to as "VC&MD") the powers to get the schemes declare its intention. In accordance with the powers delegated by CIDCO Board, VC&MD vide CIDCO/CP (NAINA)/TPS-12/2022/E-148162 dated 22nd September, 2022 has accorded approval for declaration of intention for making of Town Planning Scheme no. 11 under Section 60(1) of the said Act at part in Villages Derawali, Palaspe, Kudave, Nandgaon, Vadavali, Turmale and Shirdhon of Taluka Panvel, District Raigad and a notice about declaration of making TPS-11 as per provision in Section 60(2) of the said Act, has been published in the Extraordinary official Maharashtra Government Gazette (part-II) dated 14th October, 2022 as well as in the daily newspapers "Dainik Sagar" and "Free Press Journal" on 20th October, 2022;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. टीपीएस-१२१९/१५२४/प्र.क्र.६४/ १९/नवि १२ dated 30th December, 2019 and 28th February, 2024 has sanctioned the suspension of certain regulations of Development Control and Promotion Regulations of Development Plan of NAINA corresponding to proposed special DCR of TPS-11 in accordance with section 59(1)(b)(iii) of the Act for the proper carrying out of the scheme.

And whereas, after conducting owners meet on 19th, 20th and 21st April, 2023, as per Rule No. 4(1) of Maharashtra TPS Rules, 1974 by calling all the land owners for discussion and after incorporating suggestions received from the owners, consultation was sought vide submission dated 10th July 2023 from the Director of Town Planning, GoM, as per section 61(1) of the said Act and as per rule no. 4(2) of TPS Rules, 1974;

And whereas, as per Section 61(1) of the said Act, the Planning Authority shall, in consultation with the Director of Town Planning, make a draft scheme for the area in respect of which the declaration was made, and publish a notice in the *Official Gazette* within nine months or within the extended period from the date of the declaration;

And whereas, the Joint Director of Town Planning, Konkan division vide Order No. TPS No 11/NAINA/Sect 61(3)/Time-limit Extension/JTDP-KDN/1886, dated 28th June, 2023 has granted extension of three months' time i.e. up to and inclusive of 13th October, 2023 for making and publication of the said draft scheme;

And whereas, the Director of Town Planning vide letter जा.क्र.वि.यो.नैना/न.र.यो.क्र.११/कलम६१(१)/ प्र.क्र.३४५/२३/टिपीव्ही-३/५१४८ dated 3rd October, 2023 had offered consultation on TPS-11 and also accorded approval for suitable amendment in the sanctioned DP reservation while making provisions in a draft TPS-11 as per provisions of section 59(2) of the said Act.

And whereas, under section 61(1) of the said Act, necessary changes have been incorporated as per consultation by Director of Town Planning, a Notice of making draft TPS-11 had been published in extraordinary official Maharashtra Government Gazette (part-II) dated 11th October,2023 and in local newspapers "Dainik Sagar" and "News band" on dated 17th October, 2023 for inviting suggestions/objections within one month of notice in accordance with the provisions of section 67 of the said Act.

And whereas, the Government of Maharashtra in exercise of powers conferred by sub-section (1) of section 151 of the Said Act, vide Notification No. TPS-1817/973/CR-103/17/UD-13 dated 13th September 2017 had delegated the powers exercisable by it under section 68(2) of the said Act to Managing Director, CIDCO (hereinafter will be referred to as "VC&MD").

And whereas, after incorporating necessary changes as per suggestions received, the draft scheme has been submitted to VC&MD for sanction in accordance with section 68(1) of the Said Act on 1st Jan, 2024.

And whereas, in accordance with sub-section (2) of section 68 of the Said Act, VC&MD has sought consultation of Director of Town Planning, Maharashtra State on 10th Jan, 2024 prior to sanction of Draft Scheme.

And whereas, the Director of Town Planning vide letter No. जा. क्र. नरयो क्र. ११/नैना/कलम ६८(१)/१८२५ dated 26th March, 2024 has given consultation under section 68(2) of the said act for sanction of Draft TPS-11.

And whereas, Model Code of Conduct by the Election Commission of India in respect of general election to Lok Sabha was made applicable with effect from 16th March 2024 and further extended by the notification of 6th June, 2024 for State Legislative Council Election of Post-Graduate Constituency Konkan Division till the completion of the election i.e 5th July 2024 as per Election Commission of India, Press Note dated 24th May, 2024, the said time period is excluded under section 148-A of the said act.

Therefore, now in accordance with the powers delegated to me by the State Government vide Notification dated 13th September 2017, the **Draft Town Planning Scheme No. 11 (TPS-11)** at part of Villages Derawali, Palaspe, Kudave, Nandgaon, Vadavali, Turmale and Shirdhon of Taluka Panvel, District Raigad is hereby sanctioned under section 68(2) of the MR&TP Act, 1966 along with corresponding Special Development Control Regulations.

A Copy of sanctioned draft TPS-11 plans along with corresponding special DCRs and Forms are made available for inspection by the public during office hours on all working days in the office NAINA, 8th floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400614 in accordance with sub-section (3) of section 68 of the Said Act. The same is also uploaded on website of CIDCO i.e. https://cidco.maharashtra.gov.in//naina and further can be obtained on payment of prescribed fees.

Place : Navi Mumbai
Date : /07/2024
Regd. Office : Nirmal, 2nd floor, Nariman point, Mumbai-400021.

**Vijay Singhal**
**Vice Chairman & Managing Director, CIDCO**

## सूचना

### महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ६८ च्या उपकलम (२) नुसार

### नगररचना परीयोजना क्रमांक ११ (टीपीएस -११)

**क्र. सिडको/नैना/ न.र.यो. ११/ प्रा.यो./२०२४/११५, दि. १८ जुलै २०२४**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६ ) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२ दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१२१५/२४५/सीआर -३३२/२०१५/एस.एम./यूडी -१२, दिनांक २७ एप्रिल, २०१७ नुसार अधिनियमाच्या कलम ३१(१) नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि-१२ दिनांक ०१ मार्च, २०१९ अन्वये अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहेत;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१७१७/ एमआयएस २७५०/सीआर - ९१/२०१९/यूडी -१२, दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ नुसार नैनातील १५१ गावांसाठी विकास आराखडा मंजूर केला आहे आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२२१/१०४१/ प्र.क्र. ७१/२१/ नवि -१२ दिनांक २४ जून, २०२२ व अधिसूचना क्र. टीपीएस-१२२१/ १०४१/ प्र.क्र.७१/२१/ ईपी. २९/ नवि-१२ दिनांक २६ जुलै, २०२३ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप-कलम (१) नुसार विकास आराखड्याचा वगळलेले भाग अंशतः मंजूर केले आहे;

आणि ज्याअर्थी सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२५५१ दिनांक ०२ एप्रिल, २०२२ अन्वये नगर रचना परीयोजना करण्याचा उद्देश घोषित करण्याचे कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार अधिकार उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना दिले आहे;

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ०२ एप्रिल, २०२२ रोजीच्या ठराव क्र. १२५५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून क्र. सिडको/नैना/२०२२/ E-१४६०५९ द्वारे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी, पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील मौजे डेरवली, पळस्पे, कुडावे, नांदगाव, वडवली, तुरमाळे आणि शिरढोण गावांच्या काही भागात उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार नगररचना परीयोजना क्र. ११ करण्याचा उद्देश घोषित केला आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (२) खालील सूचना दि. १४ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात (भाग -२) यामध्ये व दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या मराठी स्थानिक वृत्तत्रात "दैनिक सागर आणि फ्री प्रेस जर्नल (Free Press Journal)" या इंग्रजी वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परीयोजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उक्त अधिनियमाच्या कलम ५९(१)(ख)(iii) अन्वये महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१२१९/२३८२/प्र.क्र.१८६/१९/नवि-१२ दि. ३० डिसेंबर, २०१९ व दि. २८ फेब्रुवारी, २०२४ अन्वये मंजूर विकास योजनेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या काही तरतुदींच्या तहकुबीला मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र न. र. प. नियम १९७४ च्या नियम क्र. ४(१) नुसार दिनांक १९, २० व २१ एप्रिल, २०२३ रोजी संबंधित जमीन मालकांची सभा आयोजित करून आणि जमीन मालकांकडून मिळालेल्या सूचनांचा समावेश केल्यानंतर दि. १० जुलै, २०२३ रोजीच्या प्रस्तावान्वये टीपीएस-११ चा कच्चा मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार आणि महाराष्ट्र टीपीएस नियम १९७४ च्या नियम क्रमांक ४(२) नुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे कलम ५९(२) अन्वये मान्यता व कलम ६१ (१) प्रसिद्धीपूर्व सल्ला मसलतीसाठी पाठविण्यात आला.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार, नियोजन प्राधिकरणाने संचालक, नगर रचना, यांच्याशी सल्लामसलत करून, ज्या योजनेसाठी घोषणा करण्यात आली त्या क्षेत्रासाठी प्रारूप योजना तयार करुन घोषणेच्या तारखेपासून नऊ महिन्यांच्या आत किंवा वाढीव कालावधीत अधिकृत महाराष्ट्र शासन राजपत्रात नोटीस प्रकाशित करावयाची आहे.

आणि ज्याअर्थी, सह संचालक, नगर रचना, कोकण विभाग यांनी आदेश क्रमांक प्रा.न.र.यो.क्र. १२/ नैना/ कलम ६१(३)/ मुदतवाढ/ सहसंकोवि/१८८६ दिनांक २८ जून, २०२३ अन्वये प्रारूप योजना बनवून प्रकाशित करण्यासाठी तीन महिन्यांचा म्हणजेच दि. १३ ऑक्टोबर, २०२३ हा दिवस धरून त्यापर्यंतचा वाढीव कालावधी दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्र जा.क्र.वि.यो.नैना/नरयो क्र. ११/कलम ६१(१)/प्र.क्र.३४५/२३/टिपीव्ही-३/५१४८ अन्वये टीपीएस-११ बाबत सल्लामसलत दिली आहे. तसेच टीपीएस -११ बनवताना मंजूर विकास योजनेच्या प्रस्तावांमध्ये झालेल्या बदलांना उक्त अधिनियमाच्या कलम ५९(२) अन्वये मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना यांनी सल्लामसलतीत सुचविल्याप्रमाणे आवश्यक ते बदल टीपीएस- ११ मध्ये करुन उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) च्या तरतुदीनुसार, प्रारूप टीपीएस-११ मसुदा तयार करण्यासंबंधीची नोटीस दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात (भाग-२) आणि स्थानिक वृत्तपत्रे "दैनिक सागर रायगड आणि न्यूजबॅन्ड (Newsband)" या मध्ये दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रकाशित करून, उक्त अधिनियमाच्या कलम ६७ मधील तरतुदींनुसार नोटीसच्या एक महिन्याच्या आत सूचना/ आक्षेप मागविण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम १५१ च्या उप-कलम (१) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या अधिसूचना क्रमांक टीपीएस -१८१७/ ९७३ / सीआर-१०३/१७/ नवि-१३ अन्वये त्यांच्यातर्फे कलम ६८(२) अंतर्गत वापरण्यात येणारे अधिकार सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, यांना प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, प्राप्त झालेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक बदल समाविष्ट केल्यानंतर, प्रारूप योजना उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांना उक्त अधिनियमाच्या कलम ६८(१) नुसार दि १ जानेवारी, २०२४ रोजी मंजुरीसाठी सादर करण्यात आली.

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी दि १० जानेवारी, २०२४ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उप-कलम (२) नुसार, प्रारूप योजना मंजूर करण्यापूर्वी संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य यांची सल्लामसलत मागितली आहे.

आणि ज्याअर्थी संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य यांनी दि. २६ मार्च, २०२४ रोजीच्या जा. क्र. नरयो क्र. ११/नैना/कलम ६८(१)/१८२५ पत्रान्वये उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उप-कलम २ अन्वये प्रारूप नगर रचना परियोजना -११ च्या मंजुरी बाबत सल्लामसलत दिली आहे.

आणि ज्याअर्थी, भारताच्या निवडणूक आयोगाकडून लोक सभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता लागू असलेला आदर्श आचारसंहिता कालावधी दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी लागू करण्यात आला व तो ६ जून, २०२४ च्या अध्यादेशानुसार विधान परिषद कोंकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीकरिता दिनांक २४ मे, २०२४ च्या प्रेस नोट द्वारे नमूद निवडणूक संपेपर्यंत म्हणजेच दिनांक ५ जुलै, २०२४ पर्यंत वाढविण्यात आला, सदर कालावधी उक्त अधिनियमाच्या कलम १४८-अ अन्वये वगळण्यात आला आहे.

त्याअर्थी, आता या अधिसूचनेद्वारे, दि. १३ सप्टेंबर, २०१७ च्या अधिसूचनेअन्वये राज्य शासनाद्वारे मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नकाशात दर्शविल्याप्रमाणे सीमेत समाविष्ट क्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे डेरवली, पळस्पे, कुडावे, नांदगाव, वडवली, तुरमाळे आणि शिरढोण गावांच्या काही भागात प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक ११ (टीपीएस ११) त्यासोबतच्या नकाशा, अहवाल व विशेष विकास नियंत्रण नियमावलीसह उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उप-कलम (२) अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उप-कलम (३) नुसार मंजूर प्रारूप टीपीएस -११ योजनेची प्रत संबंधित विशेष नियंत्रण नियमावलीसह नैना कार्यालय, ८ वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे कार्यालयीन कामकाजाच्या सर्व दिवशी नागरिकांच्या अवलोकनार्थ खुली ठेवण्यात आली आहे. तसेच प्रारूप टीपीएस -११ ची प्रत सिडकोचे संकेतस्थळ https://cidco.maharashtra.gov.in//naina येथेसुद्धा अपलोड केली आहे आणि ती विहित शुल्क भरल्यानंतर देखील मिळू शकते.

**स्थळ :** नवी मुंबई
**दिनांक :** /०७/२०२४
**नोंदणीकृत कार्यालय:** निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०००२१

**विजय सिंघल**
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

CIDCO/PR/219/2024-25

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४



● श्री. मिलिंद चंद्रकांत काठे व तेजस प्रदीप काठे आणि परिवार, मु.मापगाव, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीची आकर्षक मूर्ती व सजावट. (छाया : अब्दुल सोगावकर)



● श्री.सतीश पाटील व समीर पाटील आणि पाटील परिवार, मु. मापगाव, ता. अलिबाग, यांच्या निवासस्थानी विराजमान (छाया : अब्दुल सोगावकर)






● माणगाव तालुक्यातील गांगवली येथील संतोष दाखीनकर यांच्या निवासस्थानी स्थानपन्न झालेले गणराय. (छाया : सलिम शेख)



● नयन कर्णिक-मुरुड




● उद्योजक राजू पिचिका यांचा निसर्ग रम्य बाप्पा. ता. पेण, जि. रायगड.



● रोशन शिवराम म्हसकर, मु. नारपोली, पो. सोमटणे, पनवेल-रायगड.



● माणगाव तालुक्यातील मोर्बा ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजू मोरे यांच्या निवासस्थानी स्थानपन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलिम शेख)



● माणगाव तालुक्यातील गांगवली (मोकाशीवाडी) येथील शंकर बाळकृष्ण दाखिनकर यांच्या निवासस्थानी स्थानपन्न झालेले गणराय. (छायाचित्र : सलिम शेख)



● श्री. हेमंत काशिनाथ पेडणेकर किहीम यांचे निवासी श्री गणेशाची प्रसन्न सजावट. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● माणगाव तालुक्यातील इंदापूर येथील सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय पाटील यांनी आपल्या निवासस्थानी स्थानपन्न केलेले गणराय व अप्रतिम असा सादर केलेला पंढरीची वारी चलचित्र देखावा. (छायाचित्र : सलिम शेख)








● माथेरानमध्ये संत रोहिदास नगरात चर्मकार समाजाचे माजी अध्यक्ष हेमंत हनुमंत पवार यांच्या घरी मराठा आरक्षणाचा सुंदर देखावा सादर करण्यात आला आहे.






● माणगाव तालुक्यातील कोशिंबळे येथील सामाजिक कार्यकर्ते सहादेव बक्कम यांच्या निवासस्थानी स्थानपन्न केलेले गणराय. (छायाचित्र- सलीम शेख)



● श्री. प्रशांत राऊत किहीम यांचे इथली श्री गणरायाची भव्य सजावट. (छायाचित्र- सुरेश खडपे)

## बोरगावात आरोग्य तपासणी शिबीर

**। हमरापूर । वार्ताहर ।**

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या बहुविशेषज्ञ सामुदायिक आरोग्य तपासणीचा प्रयोग पेण तालुक्यात होत आहे. यात तालुक्यातील ४० गावांतील ग्रामस्थांचे पुढील ६० दिवसांत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. याची सुरुवात बोरगाव येथे वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी सरपंच खाकर, उपसरपंच हरेश पाटील, ग्रामसेवक गणेश पाटील, माजी सरपंच सुधीर पाटील, सुरेश आणगत, संदीप धाकवल यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

आरोग्य शिबिरामध्ये नागरिकांना आभा नोंदणी क्रमांक, बहुविशेषज्ञ आरोग्य तपासणी, रक्त तपासणी, इसीजी तपासणी आदी तपासण्या करण्यात आल्या आहेत. तसेच, गरजू रुग्णांना पुढील उपचारासाठी रेफरल सेवा आणि विविध शासकीय योजना आणि आरोग्य कार्यक्रमांविषयी जनजागृती करण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे गावातील नागरिकांना मोफत आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्यावतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, यासाठी पीएसएम विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. देवदत्त सूर्यवंशी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तालुक्यातील झोतीरपाडा, शेडाशी व वरेडी येथेही शिबीर पार पडले आहे.

॥ प्रथम पुण्यस्मरण ॥



भावपुर्ण श्रद्धांजली
कैं. सौ. निला लक्ष्मण म्हात्रे
मृत्यू - भाद्रपद शुद्ध अष्टमी २३/९/२०२३
तिथीप्रमाणे आज ११/९/२०२४
तुझे आशीर्वाद आमच्या पाठीशी
श्री. लक्ष्मण देविदास म्हात्रे
प्रसन्न ल. म्हात्रे, अमित ल. म्हात्रे, सौ. रेशमा पाटील-म्हात्रे
सौ. सुचिता प्र.म्हात्रे, सौ. जाई अ. म्हात्रे
चि. : वरुण, सोहम, ओजस, प्रीत
(एल.डी.म्हात्रे परिवार, सरेभाग ता. पेण)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)